# दैनिक राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३४५ I मंगळवार २९ सप्टेंबर २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com


## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा बँक निवडणूक स्थगित करण्याची मागणी

**अहिल्यानगर :** जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीला स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जितेंद्र आवासाहेब भोसले यांनी जिल्हा निबंधकांकडे निवेदन देत ही मागणी केली आहे.

निवेदनात महाराष्ट्र शासनाने राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा दुष्काळग्रस्त भागात समावेश केल्याचे नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ७३ (अ-आ) मधील तरतुदीनुसार विशिष्ट आपत्कालीन परिस्थितीत सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा अधिकार शासनाला असल्याचा दाखला देण्यात आला आहे.दुष्काळ, टंचाई, पूर, भूकंप, महामारी अथवा अन्य नैसर्गिक आपत्ती किंवा कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्यास निवडणूक पुढे ढकलता येते, असे निवेदनात म्हटले आहे.

## महत्त्वाचे..

### विथ्या रामराजने मोडला पी. टी. उषांचा ४२ वर्षांचा विक्रम



नगर : भारतीय धावपटू विथ्या रामराजने आशियाई क्रीडा स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी करत महिलांच्या ४०० मीटर अडथळा शर्यतीत कांस्यपदक पटकावले.

त्याचबरोबर तिने भारताच्या दिग्गज धावपटू पी. टी. उषा यांचा तब्बल ४२ वर्षांपासून कायम असलेला राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला. विथ्याने अंतिम फेरीत ५४.७५ सेकंदांची वेळ नोंदवत नवा राष्ट्रीय विक्रम आपल्या नावावर केला.
पी. टी. उषा यांनी १९८४च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये ४०० मीटर अडथळा शर्यतीत ५५.४२ सेकंदांची वेळ नोंदवली होती. चार दशकांहून अधिक काळ हा विक्रम भारतीय ॲथलेटिक्समध्ये कायम होता. विथ्याने त्यापेक्षा ०.६७ सेकंदांनी सरस वेळ नोंदवत हा विक्रम आपल्या नावावर केला. विथ्याच्या या कामगिरीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे २०२३च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत तिने ५५.४२ सेकंदांची वेळ नोंदवत पी. टी. उषांच्या विक्रमाची बरोबरी केली होती. त्यानंतर तीन वर्षांनी तिने स्वतःचाच वेग आणखी वाढवत राष्ट्रीय विक्रम मोडला.

# ‘आम्ही जाणार नाही... आमच्यासोबत या’

## एनडीएसोबत जाण्याच्या चर्चांना शरद पवारांचा पूर्णविराम

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या राजकीय चर्चांना राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सोमवारी स्पष्ट शब्दांत पूर्णविराम दिला. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी होणार असल्याच्या तसेच दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चांना त्यांनी नकार दिला. मुंबईतील पक्षाच्या बैठकीत बोलताना, आपण कुठेही जाणार नाही, आम्ही कुणासोबत जाणार नाही. यायचे असेल तर आमच्यासोबत या, असे सांगत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.**

**राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलनाची भूमिका घेण्याचा इशारा देतानाच, राजकीय पातळीवर मात्र आपला पक्ष कोणत्याही नव्या आघाडीकडे जाणार नसल्याचे पवारांनी स्पष्ट केले. त्यामुळे त्यांच्या सोमवारी केलेल्या वक्तव्याने राष्ट्रवादीच्या संभाव्य विलीनीकरण आणि एनडीएतील प्रवेशाबाबत सुरू असलेल्या चर्चांना नवे वळण मिळाले आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या भेटीनंतर तसेच राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाच्या चर्चांमुळे राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्क सुरू होते. मात्र, पवारांच्या या वक्तव्यामुळे त्यांच्या पक्षाची पुढील राजकीय दिशा त्यांनी स्पष्ट केली आहे. पक्ष स्वतंत्रपणे संघटन मजबूत करण्यावर भर देणार असल्याचेही त्यांच्या भूमिकेतून स्पष्ट झाले.

### दुष्काळी प्रश्नांवर सरकारला संघर्षाचा इशारा

दरम्यान, बैठकीत राज्यातील दुष्काळी परिस्थितीवरही सुमारे अडीच तास चर्चा झाली. दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण नागरिकांच्या मागण्यांबाबत सरकारकडे निवेदन देण्यात येणार असल्याचे पवार यांनी सांगितले. येत्या दोन-चार दिवसांत सरकारकडे या मागण्यांचा आग्रह धरण्यात येईल. मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याचा इशाराही त्यांनी दिला.



राज्यातील २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. मात्र, या यादीतून काही भाग व पिके वगळली गेल्याचा मुद्दा पवारांनी उपस्थित केला. विशेषतः केळी उत्पादकांना मदत मिळण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना नवीन कर्ज मिळण्याबाबत येणाऱ्या अडचणी आणि थकबाकीच्या प्रश्नावरही जनजागृती करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारने तातडीने ठोस निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

दुष्काळाच्या काळात केंद्राकडूनही मदतीचे निर्णय घेता येतात, याचा संदर्भ देताना पवारांनी आपल्या केंद्रीय मंत्रिमंडळातील कार्यकाळातील अनुभव सांगितला. जालना जिल्ह्यातील मोसंबी उत्पादकांचा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर मोसंबी पिकासाठी मदतीचा निर्णय घेतल्याची आठवण त्यांनी सांगितली. सध्याच्या परिस्थितीतही पिकनिहाय नुकसान लक्षात घेऊन मदतीचे निकष व्यापक करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# अधिकाऱ्यांची अरेरावी खपवून घेणार नाही!

## आमदार-खासदारांच्या पत्रांकडे दुर्लक्ष केल्यास शिस्तभंगाची कारवाई होणार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** लोकप्रतिनिधींच्या पत्रांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अथवा त्यांच्याशी अवमानकारक वर्तन करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना आता लगाम घालण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आमदार आणि खासदारांनी पाठविलेल्या पत्रांवर तातडीने कार्यवाही करून जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या आत अंतिम उत्तर देणे अधिकाऱ्यांना बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्देशांचे उल्लंघन झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे.

### दोन महिन्यांची मुदत

**आमदार किंवा खासदारांनी पाठविलेल्या पत्रावर केवळ प्राप्ती कळवून प्रकरण प्रलंबित ठेवता येणार नाही. संबंधित प्रकरणावर कार्यवाही करून कमाल दोन महिन्यांत अंतिम उत्तर देणे आवश्यक राहणार आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून नागरिकांकडून येणाऱ्या प्रश्नांच्या पाठपुराव्याला अधिक निश्चित कालमर्यादा मिळणार आहे.**

विधानसभेच्या विशेषाधिकार समितीच्या १ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत लोकप्रतिनिधींच्या पत्रांकडे दुर्लक्ष तसेच अधिकाऱ्यांच्या वर्तनाबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली होती. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने २८ सप्टेंबर रोजी सुधारित व सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे जारी केल्याची माहिती देण्यात आली आहे.

नव्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, लोकप्रतिनिधींशी दूरध्वनीवर संवाद साधताना आदरयुक्त भाषा वापरणे, शासकीय कार्यक्रमांच्या निमंत्रणपत्रिकेत आमदार-खासदारांची नावे अचूक नमूद करणे आणि राजशिष्टाचारानुसार बैठक व्यवस्था करणे आवश्यक राहणार आहे. तसेच प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमध्ये समन्वय वाढविण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरुवारी दोन तासांचा कालावधी लोकप्रतिनिधींच्या भेटीसाठी आणि त्यांच्या प्रलंबित कामांच्या आढाव्यासाठी राखीव ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.लोकप्रतिनिधींनी संसदीय कर्तव्य बजावण्यासाठी मागितलेली माहितीही, गोपनीयतेशी संबंधित अपवाद वगळता, विनामूल्य उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशासनातील निर्णयप्रक्रिया अधिक गतिमान आणि लोकप्रतिनिधींशी समन्वयपूर्ण राहण्याचा उद्देश या मार्गदर्शक तत्त्वांमागे असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# महाराष्ट्रातील दुष्काळाची केंद्राकडून पाहणी

## ३ ऑक्टोबरपासून केंद्रीय पथकांचा दौरा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची गंभीर दखल केंद्र सरकारने घेतली असून, राज्यातील परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी केंद्रीय पथक पाठविण्यात येणार आहे. केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याणमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सोमवारी नवी दिल्ली येथे ही माहिती दिली. महाराष्ट्रात ३ ऑक्टोबरपासून केंद्रीय पथकाच्या पाहणीला सुरुवात होणार असून, चौहान स्वतःही आपल्या पथकासह राज्याचा दौरा करून परिस्थितीचा आढावा घेणार आहेत.

पावसाच्या मोठ्या तुटीमुळे राज्यातील दुष्काळाची व्याप्ती वाढली आहे. महाराष्ट्र सरकारने ३५८ पैकी २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला असून, राज्यातील सुमारे ७४ टक्के तालुके या निर्णयाच्या कक्षेत आले आहेत. दुष्काळ व्यवस्थापन संहितेतील ‘ट्रिगर-१’ निकष पूर्ण झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पीक



नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

या पार्श्वभूमीवर आगामी रब्बी हंगामाचे नियोजन हे उपलब्ध पाणी, जमिनीतील ओलावा आणि सिंचनाची क्षमता लक्षात घेऊन करण्याचे आवाहन चौहान यांनी केले. पाणीटंचाई असलेल्या भागात कमी पाण्यात येणाऱ्या कडधान्ये आणि तेलबिया पिकांना प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. धान कापणीनंतर उपलब्ध होणाऱ्या क्षेत्रात हरभरा, मसूर आणि मोहरीसारख्या पिकांची लागवड वाढविण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.

रब्बी हंगामासाठी बियाणे, खते आणि अन्य निविष्ठांचा आगाऊ आराखडा तयार ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना योग्य वाणांची निवड आणि पीक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्याबरोबरच खतांचा संतुलित वापर करण्यावर भर देण्यात येणार आहे. जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी ‘खेत बचाओ’ अभियान राबविण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

### रब्बीचे नियोजन पाण्याच्या ताळेबंदावर

दुष्काळी भागात उपलब्ध पाण्याचा ताळेबंद तयार करूनच रब्बी पिकांची निवड करावी, जमिनीतील ओलावा आणि सिंचनाची उपलब्धता तपासावी तसेच कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य द्यावे, असा स्पष्ट संदेश केंद्रीय कृषिमंत्र्यांनी दिला आहे

दरम्यान, पावसाअभावी खरीप पिकांवर झालेला परिणाम आणि आगामी रब्बी हंगामासाठी उपलब्ध पाण्याची स्थिती यांचाही केंद्रीय पथकाकडून आढावा घेतला जाणार आहे. पेरणीची प्रगती, उगवण, रोग-किडींचा प्रादुर्भाव आणि बाजारभाव यांचे साप्ताहिक निरीक्षण करून आवश्यक उपाययोजना करण्यावरही भर देण्यात आला आहे.

महाराष्ट्राबरोबरच कर्नाटकातील दुष्काळी परिस्थितीचाही केंद्राकडून आढावा घेतला जाणार आहे. दोन्ही राज्यांतील प्रत्यक्ष परिस्थितीचा अहवाल मिळाल्यानंतर पुढील उपाययोजनांसाठी केंद्र व राज्य यंत्रणांमध्ये समन्वय साधला जाणार आहे. त्यामुळे केंद्रीय पथकाच्या पाहणीमुळे महाराष्ट्रातील दुष्काळाची प्रत्यक्ष व्याप्ती, पीकहानी आणि पाणीटंचाईचे चित्र केंद्रासमोर अधिक स्पष्ट होणार आहे.

# एमआयडीसीच्या जमिनीवर धनदांडग्या शेतकऱ्यांचे अतिक्रमण,आदेश कागदावरच

## प्रशासनाच्या नाकाखाली १०० एकरचा ’आर्थिक मलिदा’

सर्जेराव साळवे I राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ, पार्वतवाडी आणि पिसोरे बुद्रुक परिसरात प्रस्तावित असलेल्या एम आयडीसीच्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाचा प्रश्न आता अत्यंत गंभीर व पेटता बनला आहे. एकीकडे एमआयडीसी प्रशासन अतिक्रमण हटवण्याचे कागदी घोडे नाचवत असताना, दुसरीकडे धनदांडग्या शेतकऱ्यांनी प्रशासकीय आदेशांना थेट केराची टोपली दाखवत तब्बल १० ते १५ एकर शासकीय जागेवर नव्याने कांद्याची लागवड केल्याचा



धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

शासकीय जमिनीवर बेकायदेशीर ताबा मिळवून लाखो रुपयांचे उत्पन्न लाटणाऱ्या या धनदांडग्यांसमोर हतबल झालेले प्रशासन नेमकी कोणाची री ओढत आहे? असा संतप्त सवाल आता आम जनतेतून उपस्थित केला जात आहे.

**१०० एकरवर खाजगी शेती; ’आर्थिक मलिदा’ नक्की कुणाच्या खिशात?**

एमआयडीसीच्या ताब्यात असलेल्या सुमारे ६२४ एकर शासकीय जमिनीपैकी जवळपास १०० एकर क्षेत्रावर बड्या आणि वजनदार व्यक्तींनी बेकायदेशीर ताबा मिळवून शेती थाटल्याचा खळबळजनक आरोप होत आहे. या शासकीय जमिनीवर उजळमाथा म शागत केली जाते, पिके घेतली जातात आणि काहींकडून तर विजेचा **(पान ४ वर)**

# अजितदादांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी माळेगाव कारखाना देशात अग्रस्थानी नेऊ : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** माळेगाव सहकारी साखर कारखान्याला देशातील अग्रगण्य कारखान्यांच्या पंक्तीत नेण्याचे स्वर्गीय अजित पवार यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे, असे आवाहन कारखान्याच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या ७१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत त्या बोलत होत्या.

स्वर्गीय अजित पवार यांच्या निधनानंतर कारखान्याच्या अध्यक्षपदाची जबाबदारी आपल्यावर आली. माळेगाव कारखाना ही केवळ सहकारी संस्था नसून लोकचळवळ आहे. कारखाना काहीसा मागे पडत असल्याचे लक्षात आल्यानंतर अजितदादांनी त्याची जबाबदारी स्वीकारली होती. हा कारखाना देशात क्रमांक एकवर नेण्याचे



त्यांचे स्वप्न होते. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी दाखविलेल्या विकासाच्या मार्गावरून पुढे जाण्याचा निर्धार सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केला. सभासदांनी सभेत मांडलेल्या सूचना व विविध प्रश्नांची सकारात्मक दखल घेतली **(पान ४ वर)**

# राहुरीची माहेरवाशीन आई तुळजाभवानीची पालखी तुळजापूर कडे रवाना

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत राहुरीची माहेरवाशिन आई तुळजाभवानी मातेची पालखी राहुरीतून खणा नारळाने ओटी भरून खेळवत ट्रॉलीमध्ये शहरात मिरवून तुळजापूरकडे उत्साहात रवाना करण्यात आली.

तुळजापूर येथील नवरात्रोत्सवासाठी दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी राहुरी शहरातील जंगम गल्ली येथील तुळजाभवानी मातीच्या मंदिरात बाजार समितीचे सभापती अरुण तनपूरे, सुजाताताई तनपूरे, आमदार अक्षय कर्डिले तसेच नगरसेवक हर्ष तनपूरे यांनी सपत्नीक पालखीचे विधिवत पुजन करुन साडी चोळीने ओटी भरली. त्यानंतर मानकरी



असलेले सुरेश धोत्रे, अण्णासाहेब शेटे यांच्या कुटुंबाच्या वतीने पालखीचे पुजन करण्यात आले. नंतर गोरख तांबोळी यांच्या कुटुंबाच्या वतीने पालखीला पानाचा विडा देण्यात आला. त्यानंतर जंगम गल्ली ते शिवाजी चौक दरम्यान पालखीला भंडाऱ्याची उधळण करत अंगा खांद्यावर खेळविण्यात आले. नंतर फुलांनी सजवलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये पालखी ठेवून मेन रोड, आझाद चौक, शनीचौक, नवी पेठ, शुक्लेश्वर चौक, स्टेशन रोड, खळवाडी, शुक्लेश्वर चौक, कासार गल्ली, कानिफनाथ चौक, क्रांती चौक, सोनार गल्ली



मार्गे कोळीवाडा येथे पालखीचे राहुरीकरांनी खणा नारळाने ओटी भरून दर्शन घेतले. शनी मंदिर येथे मानकरी असलेल्या मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी भवानी मातेचा जयघोष करून भंडार्याची मुक्त उधळण करण्यात आली. माजी नगरसेवक सुनील पवार यांच्या वतीने गणपती घाट येथे सायंकाळी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नंतर पालखी मुळा नदीतून देसवंडीकडे रवाना करण्यात आली. प्रसंगी हजारो भाविक भक्तांनी आई राजा उदो उदो, तुळजाभवानी माता की जय, घोषणा देऊन पालखीला भावपूर्ण अशा वातावरणात रवाना करण्यात आले. एकंदरीत शहरातील वातावरण दिवसभर भक्तिमय झाले होते.

प्रसंगी नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, माजी उप नगराध्यक्ष गजानन सातभाई, नगरसेवक राजूभाई शेख, ॲड. राहुलभैय्या शेटे, दादापाटील सोनवणे, राजेंद्र उंडे, ताराचंद तनपूरे, अरुण साळवे, नयन शिंगी, अक्षय तनपूरे, गणेश खैरे, संजय पन्हाळे, सचिन मेहेत्रे, संदिप सोनवणे, भोलेनाथ लोखंडे, उमेश शेळके, सतिष फुलसौंदर, अर्जुन बुऱ्हाडे, काकासाहेब अढागळे आदिंसह श्रीरामदत्त मित्र मंडळ व शिवाजी चौक मित्र मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नुकसान पोहोचवायला संपूर्ण वातावरण आहे गुलजार, आपल्या हृदयाची स्वतःच काळजी घ्याल

**(जागतिक हृदय दिन विशेष – २९ सप्टेंबर २०२६)**

आजच्या आधुनिक युगात मनुष्याने भौतिक सुखाच्या मागे लागून आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याशी तडजोड केली आहे. जिकडे पाहावे तिकडे अनैतिकता, स्वार्थ आणि फसवणुकीचे साम्राज्य पसरलेले आहे. कोणी आपल्याशी उंच आवाजात बोलले तरी आपण त्याला उलट उत्तर देतो किंवा वाद घालतो; परंतु कोणी भेसळ, प्रदूषण आणि अस्वच्छतेच्या माध्यमातून आपल्याला महागड्या, असाध्य आणि जीवघेण्या आजारांची भेट दिली, तरी आपण त्याविरोधात साधा हुंकारही भरत नाही, कारण आपण आपली मानसिकताच तशी बनवून घेतली आहे. आपण केवळ प्रत्यक्ष स्वरूपात निर्माण होणाऱ्या समस्यांबाबत थोडेफार जागरूक असतो; मात्र अप्रत्यक्षपणे जाणाऱ्या आपल्या जीवाची आपल्याला कधीच काळजी नसते. वाढत्या मानवी लालसेने पृथ्वीवर दूषित वातावरणाचे चक्रव्यूह निर्माण केले आहे, ज्याने संपूर्ण जीवसृष्टीला घातक आजारांनी जखडले आहे, ज्यामुळे अकाली होणाऱ्या मृत्यूंमध्ये प्रचंड वाढ झाल्याने भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे; परंतु माणूस हे समजून घ्यायलाच तयार नाही. अशा लोकांच्या चुकीची शिक्षा इतर निष्पापांनाही आपला जीव गमावून भोगावी लागते.

दूषित वातावरणामुळे आज वेगाने जीवघेणे आजार वाढले आहेत. कर्करोग, हृदयरोग, स्ट्रोक या आजारांची नावे आता आपल्याला दररोजच ऐकायला मिळतात. एखादा पूर्णपणे निरोगी मनुष्य, जो व्यसन करत नाही, नेहमी पौष्टिक आहार घेतो आणि उत्तम निरोगी जीवनशैलीचा अवलंब करतो, अशा व्यक्तीलाही अनेकदा घातक आजारांमुळे जीव गमवावा लागत आहे; कारण निकृष्ट दर्जाच्या खाद्यपदार्थांची भरमार, भेसळखोरी आणि दूषित वातावरणात श्वास घेण्यास तो मजबूर आहे. आपल्या चटोरी जिभेच्या चवीच्या लालसेपोटी जनावरांनाही खाण्यायोग्य नसतील असे खाद्यपदार्थ आपण मोठ्या चवीने खातो आणि संपूर्ण शरीराला कचरापेटी बनवतो. खराब कोलेस्ट्रॉल तर आता आपल्या शरीराचा एक भागच बनले आहे. आपल्या देशात तर गोड पदार्थ, मैदा, मसाला, तेल आणि नमकीन यांच्याशिवाय दैनंदिन दिनचर्याच पूर्ण होत नाही; परंतु हे खाद्य अ त य ं त घातक आहेत.



वाढता लठ्ठपणा, आळस आणि दीर्घकाळ बसून करावे लागणारे काम या समस्या अधिक वाढवत आहेत. आजारपणामुळे वाढणारा आर्थिक ताण आणि मानसिक अस्वस्थताही आपल्या शरीराला नुकसान पोहोचवते.

जागतिक हृदय महासंघानुसार, दरवर्षी वायुप्रदूषणामुळे ७० लाख लोकांचा मृत्यू होतो. वायुप्रदूषणाशी संबंधित मृत्यूंपैकी ५० टक्के मृत्यू हृदयरोग आणि स्ट्रोकमुळे होतात. स्वयंपाक करण्यासाठी आग पेटवल्यामुळे निर्माण होणाऱ्या धुराच्या संपर्कात आल्याने दरवर्षी ३८ लाख लोकांचा अकाली मृत्यू होतो. दरवर्षी उच्च कोलेस्ट्रॉलमुळे ४४ लाख लोकांचा अकाली मृत्यू होतो. 'लॅन्सेट'मध्ये प्रकाशित झालेल्या एका नवीन अहवालात सांगण्यात आले आहे की, अंदाजे १० कोटी लोक अशा हृदयविकारांसह जीवन जगत आहेत, ज्यांच्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. यामध्ये जीव गमावणारे बहुतांश लोक गरीब असतात. वर्ष २०२३ मध्ये जगभरात २३ लाख मुले जन्मजात हृदयरोगासह जन्माला आली. अमेरिकेत गुंतागुंतीच्या जन्मजात हृदयरोगासाठी प्रति रुग्ण आयुष्यभराचा सरासरी खर्च २.१ मिलियन अमेरिकी डॉलर आहे, तर आयुष्यभराचा एकूण आर्थिक परिणाम ३.३५ ट्रिलियन अमेरिकी डॉलरपेक्षाही अधिक आहे.

ग्लोबल अलायन्स फॉर क्रॉनिक डिसीजच्या मते, वर्ष २०२१ मध्ये हृदय आणि रक्तवाहिन्यांच्या आजारांमुळे २.०५ कोटी लोकांचा मृत्यू झाला, जे जगभरात झालेल्या एकूण मृत्यूंच्या ३२ टक्के आहे. हृदयरोगामुळे होणाऱ्या ८५ टक्के मृत्यूंपैकी हार्ट अटॅक आणि स्ट्रोक ही प्रमुख कारणे आहेत. यापैकी ७५ टक्क्यांहून अधिक मृत्यू कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये होतात. देशात दरवर्षी हृदय आणि हृदय-वाहिन्यांशी संबंधित आजारांमुळे जवळपास २८ – ३१ लाख लोकांचा अकाली मृत्यू होतो. वर्ष २०२४ मध्ये हृदयरोगामुळे झालेल्या एकूण मृत्यूंची संख्या ३,१६५,१७२ होती. भारतात हृदयविकाराच्या जवळपास ७० टक्के रुग्णांकडे आरोग्य विमा नाही आणि ते आर्थिक सुरक्षिततेपासून वंचित आहेत. या आजारामुळे जवळपास ३२ टक्के रुग्ण आणि ३६ टक्के कुटुंबांच्या मासिक उत्पन्नात मोठी घट होते. १७.७ टक्के कुटुंबांना वैद्यकीय खर्च भागवण्यासाठी अनिश्चित काळासाठी कर्ज घ्यावे लागते किंवा मालमत्ता विकावी लागते.

हृदय कमजोर करणाऱ्या गोष्टींपासून सदैव दूर राहा. कोणत्याही प्रकारचे व्यसन जीवघेणे ठरू शकते. वजन, उच्च रक्तदाब आणि मधुमेह नियंत्रणात ठेवा. पौष्टिक आहार घ्या. मानसिक ताणाकडे दुर्लक्ष करू नका, मानसिक आरोग्याची काळजी घ्या. आनंदी वातावरण निर्माण करा, समाधानी राहायला शिका. ८ तासांची पूर्ण झोप घ्या, दररोज व्यायाम करा, निरोगी छंदांना जोपासा. खोट्या दिखाव्यापासून दूर राहा. ज्यांना भावनांची कदर नाही, त्यांच्यापासून दूर राहा. लोकांकडून अपेक्षा ठेवू नका, आधुनिक जीवनशैलीचा त्याग करा. गोड पदार्थ, मसाला, मैदा, तेल, नमकीन, पॅकबंद खाद्यपदार्थ, कोल्ड्रिंक आणि अत्याधिक प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ शरीराचे नुकसान करतात. खाद्यपदार्थांची निवड चवीप्रमाणे नव्हे, तर त्यांच्या पोषणमूल्यांकडे पाहून करा.

प्लास्टिकपासून बनवलेल्या पिशव्या, भांडी आणि बाटल्यांचा वापर त्वरित बंद करा. खाद्यपदार्थांसाठी प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर विषासमान आहे. नेहमी स्वच्छतेची काळजी घ्या. आधुनिक साधनसामग्रीवरील अवलंबित्व कमी करा. आळसाचा त्याग करा. सतत बसून राहण्याचे काम टाळा; शक्य नसेल तर थोडा ब्रेक घ्या. सामाजिक परोपकाराची जाणीव ठेवा. पर्यावरणाला नुकसान पोहोचवणाऱ्यांचा कडाडून विरोध करा, कारण निरोगी राहण्यासाठी सर्वप्रथम शुद्ध ऑक्सिजन, पौष्टिक आहार आणि स्वच्छ पाणी आवश्यक आहे, हे कधीही विसरू नका. जेव्हा कोणी प्रदूषण, भेसळखोरी, अस्वच्छता, झाडांची तोड, अतिक्रमण, घोंघाटा किंवा भ्रष्टाचार करतो, तेव्हा एक गोष्ट लक्षात ठेवा की तो अप्रत्यक्षपणे आपलाच जीव घेत आहे. कीटकांप्रमाणे आपले जीवन वाया घालवू नका. जीवन पुन्हा मिळत नाही; आरोग्य हीच खरी संपत्ती आहे.

**लेखक**
**डॉ. प्रितम भि. गेडाम**
**(महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत लेखक)**
**मोबाईल आणि व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक – ०८२३७४१७०४१**
**ईमेल आयडी –**
prit00786@gmail.com

# कामधेनू पतसंस्थेची वार्षिक सभेत १५ टक्के लाभांश देण्याची घोषणा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील बेलापूर येथील 'कामधेनू ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची' २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी (२६ सप्टेंबर) रोजी हरिहर केशव गोविंद शॉपिंग कॉम्प्लेक्स, कुऱ्हे वस्ती याठिकाणी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या संस्थेची पंचक्रोशीत आदर्शवत संस्था म्हणून नावारूपाला आली असून, या पतसंस्थेच्या सभेने सभासदांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

संस्थेचे विद्यमान चेअरमन प्रतापराव पटारे या सभेच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी संस्थेचे संस्थापक मधुकर शिंदे, व्हा.चेअरमन सोपानराव खोसे, संचालक संदीप शिंदे, माजी व्हा. चेअरमन बाबासाहेब वाकडे, ऑडिटर एस.एल.पुंड, तुकाराम शिंदे यांच्यासह संचालक मंडळ, सभासद उपस्थित होते.

मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचन वसुली अधिकारी ज्ञानेश्वर लोंखडे यांनी केले. यावेळी लोखंडे यांनी सागितले की उत्कृष्ट कर्जवसुलीमुळे ठेवीदारांचा संस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला असून, संस्थेला 'ब' वर्ग ऑडिट प्राप्त झाले असून संस्थेकडे एकूण ३ कोटी २८ लाखांच्या ठेवी आहेत.सभासदांना २ कोटी ६८ लाखांचे कर्जवाटप करण्यात आले आहेत. संस्थेच्या प्रगतीची परंपरा कायम राखत यंदा सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याची घोषणा चेअरमन प्रतापराव पटारे यांनी आपल्या भाषणात केली. नुकतेच पतसंस्था फेडरेशनमार्फत या संस्थेला 'आदर्शवत पतसंस्था' म्हणून गौरविण्यात आले आहेत.

सभेच्या सुरुवातीला गतवर्षभरात दिवंगत झालेल्या संस्थांच्या सभासदांना आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी शांताराम शिंदे, माजी चेअरमन राजधर मेहेत्रे, किरण गागरे, प्रसाद हुरे, रवींद्र क्षीरसागर, आण्णासाहेब माळी, धोंडिराम भगत, रामभाऊ नागरे, गणेश मोरे, विलास शिंदे, संदीप तांबे, ज्योती शिंदे, मंगल भडके, हुसेना पठाण, राजेंद्र शिंदे यांच्यासह अनेक सभासद आणि कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# चिंचविहिरे जि. प. प्राथ. शाळेच्या व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी संदिप नालकर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** स्थानिक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचविहिरे येथे शाळा व्यवस्थापन समितीच्या पुनर्गठनासाठी विशेष पालक सभेचे करण्यात आले. या सभेत शासनाच्या नियमांनुसार पारदर्शक कार्यवाही करत नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी संदिप यादवराव नालकर तर उपाध्यक्षपदी सोनाली भारत साळवे यांची सर्वानुमते निवड जाहीर करण्यात



शाळेच्या प्रांगणात आयोजित या पालक सभेस ग्रामस्थ व पालकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवली. बैठकीच्या सुरुवातीला सभेचा मुख्य उद्देश व शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे वाचन करण्यात आले. त्यानंतर सर्व पालकांच्या सहमतीने शाळा व्यवस्थापन समितीच्या नूतन सदस्यांची निवड करण्यात आली. समितीच्या सदस्यपदी सोनाली प्रमोद तोरणे, रवींद्र बाळासाहेब नरोडे,मनीषा संजय नालकर,अर्चना सचिन साळवे, सतीश बर्डे, मेघा सचिन बर्डे, ममता शरद नरोडे, सचिन सोपान नालकर व राहुल शेलार यांची एकमुखाने निवड करण्यात आली.

# दत्तनगरच्या उपसरपंचपदी शाकेरा बागवान बिनविरोध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** तालुक्यातील दत्तनगर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अल्पसंख्याक समाजातील महिला आणि फुले-शाहू-आंबेडकर विचारांच्या चळवळीत सक्रिय असलेल्या शाकेरा शहाजान बागवान यांची बिनविरोध निवड झाली. ससाणे गटाच्या शाकेरा बागवान यांच्या निवडीमुळे ग्रामपंचायतीत महिला नेतृत्वाला संधी मिळाली आहे. निवडीसाठी ग्रामपंचायतीची विशेष सभा घेण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी लोकनियुक्त सरपंच सारिका प्रेमचंद कुंकूलोळ होत्या. ग्रामविकास अधिकारी रुबाब पटेल यांनी सहाय्यक म्हणून काम पाहिले. दत्तनगर गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य बाबासाहेब दिघे, आशाताई दिघे, संदीप मगर, सुनील शिरसाठ, पी. एस. निकम, रवी गायकवाड, सुनील जगताप, मोहन आव्हाड आदींनी नवनिर्वाचित उपसरपंचांचे अभिनंदन केले. आ. हेमंत ओगले, नगराध्यक्षा करण ससाणे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, सुधीर नवले व काँग्रेस गटनेते मुजफ्फर शेख यांनीही शाकेरा बागवान यांचे अभिनंदन केले.

# ऊस उत्पादकांच्या मागण्यांसाठी साखर आयुक्तांना विविध संघटनांचे निवेदन

## ७ ऑक्टोबरपर्यंत तोडगा न निघाल्यास 'हल्लाबोल' आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महाराष्ट्रातील विविध शेतकरी संघटनांच्या वतीने ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखाने आणि सरकारच्या हिताच्या विविध मागण्यांसाठी पुणे येथील साखर आयुक्त संजय कोलते यांना निवेदन देण्यात आले. या मागण्यांवर राज्य सरकारसोबत संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक घेऊन ७ ऑक्टोबर २०२६पर्यंत सकारात्मक तोडगा काढावा, अन्यथा ८ ऑक्टोबरपासून महात्मा फुले कृषी महाविद्यालय चौक ते साखर आयुक्त कार्यालयावर बेमुदत 'हल्लाबोल' व ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

यंदा पावसाचे प्रमाण कमी असल्याने ऊसाची अपेक्षित वाढ झालेली नाही. ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरदरम्यान साखरेचा उतारा ८ ते ९ टक्के, तर डिसेंबर ते मार्चदरम्यान १३ ते १५ टक्क्यांपर्यंत असतो. त्यामुळे १५ ऑक्टोबरपासून गाळप हंगाम सुरू केल्यास कमी उताऱ्यामुळे शेतकरी व कारखान्यांचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने गाळप हंगाम १५ नोव्हेंबरनंतर सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली.

दोन साखर कारखान्यांमधील २५ किलोमीटर अंतराची अट रद्द करावी, तोष्णीवाल समितीच्या शिफारशीनुसार अंतरानुसार ऊस वाहतूक दर निश्चित करावेत, देशांतर्गत साखरेचा किमान विक्री दर ५५ रुपये किलो करावा, घरगुती साखर ६० रुपये किलोपर्यंत उपलब्ध करून द्यावी, तसेच औद्योगिक व रासायनिक वापरासाठी साखरेचा स्वतंत्र दर निश्चित करावा, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या.

डिजिटल वजनचोरी रोखण्यासाठी भरारी पथकात माहिती-तंत्रज्ञान अभियंत्यांचा समावेश करावा. ऊसाचे वजन झाल्यानंतर ३० सेकंदांत शेतकऱ्याच्या भ्रमणध्वनीवर संदेश पाठवणे बंधनकारक करावे. महसूल उत्पन्नातील वाट्याचा हिशोब न देणाऱ्या तसेच थकीत एफआरपी व त्यावरील व्याज न देणाऱ्या कारखान्यांवर आरआरसीअंतर्गत कारवाई करून संबंधित रक्कम संचालक मंडळ व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक संपत्तीतून वसूल करावी, अशीही मागणी करण्यात आली.२०२५-२६च्या हंगामातील साखरेच्या दराचा विचार करून शेतकऱ्यांना प्रतिटन किमान ५२५ रुपये दुसरा हप्ता द्यावा. खते, मजुरी व



वाहतूक खर्चातील वाढ लक्षात घेऊन ऊसदर निश्चित करावा, अशी मागणीही करण्यात आली. या निवेदनावर प्रा. डॉ. जालिंदर पाटील, भगवान काटे, शिवाजी माने, सावकार मादनाईक, वैभव कांबळे, जनार्दन पाटील, श्यामसुंदर जायगुडे, रवींद्र मोरे, बाळासाहेब जाधव, विश्वंभर बाबर, रामदास दोरगे, संभाजीराव चौगुले, बाळासाहेब पाटील, सदाशिव कुलकर्णी, राजेंद्र लोंढे, राजू अण्णा धुमाळ, रूपेश पाटील, संदीप देसाई, उदयकुमार पाटील, तानाजी लेले, शिवाजी आंबेकर, प्रशांत दानवले, सुनील इंगळे, रावसाहेब डोंगळे, युवराज आडनाईक, रंगराव पाटील, गब्बर पाटील, विलास पाटील, नितीन कांबळे, सुनील पोवार, सुनील कामाण्णा आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी शेतकरी प्रतिनिधी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ग्रामसेविकेला धमकावल्याप्रकरणी खेमनरवर मोक्का कारवाईची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** फत्याबाद येथील ग्रामसेविका माधवी नामदेव पलघडमल यांना जातीवाचक शिवीगाळ करून खंडणी मागितल्याप्रकरणी आरोपी दत्तात्रेय खेमनर याच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)च्या वतीने अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

२४ सप्टेंबर रोजी स्मशानभूमीत मुरूम भरावाचे शासकीय काम सुरू असताना खेमनर काळ्या मोटारीतून आला. त्याने ग्रामसेविकेला शिवीगाळ करून अपमानित केले, धक्का देऊन खाली पाडले तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना दमदाटी केली. एक लाख रुपयांची खंडणी मागून धमकावल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

खेमनर याच्यावर यापूर्वीही गंभीर गुन्हे असल्याचा दावा करत त्याच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, तालुकाध्यक्ष सुनील शिरसाठ, भीमा बागूल, अनिल ननावरे आदी उपस्थित होते.

# कोपरगावच्या ३४५ एकर वतन जमिनीचा हिशोब द्या, २७ दिवसांपासून शिर्डीत धरणे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** कोपरगाव येथील महार वतनाच्या ३४५ एकर जमिनीचा संपूर्ण हिशोब मिळावा, या मागणीसाठी आंबेडकरी समाजातील नागरिक व वतनदारांच्या वारसांनी प्रशासनाविरोधात आंदोलन सुरू केले आहे. शिर्डी येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गेल्या २७ दिवसांपासून धरणे आंदोलन सुरू असून, जमिनीचा हिशोब मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

यासंदर्भात वतनदार व त्यांच्या वारसांनी नायब तहसीलदार, कोपरगाव यांना निवेदन देऊन प्रशासनाने तातडीने चौकशी करावी, अशी मागणी केली. कोपरगाव शहरातील वतन जमिनीबाबतच्या महसूल अभिलेखांमध्ये खाडाखोड झाल्याचा तसेच काही रजिस्टर व सातबारे उपलब्ध नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. काही




सर्वे क्रमांकांचीच माहिती उपलब्ध असून उर्वरित जमिनीच्या नोंदी दडपण्यात आल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे. वेदनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, २०२२ मध्ये पुणे पुरातन विभागाकडून मुघलकालीन दस्तऐवज प्राप्त करण्यात आला. मोडी लिपीतील या दस्तऐवजाचे तज्ज्ञांकडून भाषांतर करून घेतले असून, त्यात कोपरगाव शहरातील ३४५ एकर जमीन महार वतनदारांच्या नावे असल्याचा उल्लेख असल्याचा दावा करण्यात आला आहे. हा अहवाल तहसीलदारांकडे सादर करण्यात आला आहे.

यापूर्वी २०१५ व २०२० मध्येही प्रशासनाकडे अर्ज करण्यात आले होते. मात्र, मागणीची पूर्तता न झाल्याने आंदोलन सुरूच ठेवण्याची भूमिका आंदोलकांनी घेतली आहे.

# उसावर लोकरी मावा, टिपक्याच्या अळीचे संकट, दुसऱ्यांदा फवारणीची वेळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वळण :** राहुरी तालुक्याच्या पूर्व भागातील वळण, मानोरी, मांजरी, कोपरे, शनवडगाव, पाथरे खुर्द परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसमोर नव्या संकटाने उभे ठाकले आहे. गेल्या दोन-तीन महिन्यांपासून ऊस पिकावर लोकरी मावा व टिपक्याच्या अळीचा प्रादुर्भाव वाढल्याने पिकाचे नुकसान होत असून, शेतकऱ्यांना दुसऱ्यांदा फवारणी करावी लागत आहे.



यंदा पावसाअभावी सोयाबीन, कापूस, मका यासह विविध पिकांना पाण्याची कमतरता भासत आहे. त्यातच उसावरील किडीच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांचा खर्च वाढला आहे. शेतकरी सिताराम गोसावी यांनी सांगितले की, पिके अडचणीत असताना उसावर ड्रोनच्या साहाय्याने फवारणी करण्याची वेळ आली आहे. यापूर्वीही परिसरात साखर कारखान्याच्या माध्यमातून हेलिकॉप्टरने फवारणी करण्यात आली होती.

शेतकरी बाळासाहेब खुळे म्हणाले की, औषधांच्या फवारणीमुळे काही ठिकाणी उसाची पाने जळत असून वाढ खुंटण्याची भीती आहे. फवारणीसाठी एकरी ७०० ते १ हजार रुपये, तर औषधासाठी सुमारे १ हजार रुपये खर्च येत आहे.

यावेळी संजय शेळके, विठ्ठल होन, आशुतोष होन, गोविंद जाधव, यमासाहेब जाधव, आशिष जाधव, रमण खुळे आदी शेतकरी उपस्थित होते. राहुरी कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर खुळे यांनीही फवारणीशिवाय पर्याय नसल्याचे सांगितले.

# व्यवसाय वाचविण्यासाठी शासनाने दूध उत्पादकांच्या पाठिशी उभे राहावे : परजणे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** दुष्काळाची तीव्रता वाढल्याने दूध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून शासनाने दुधाला प्रतिलिटर किमान दहा रुपये अनुदान तातडीने सुरू करावे आणि दूध उत्पादकांच्या पाठिशी ठामपणे उभे राहावे, अशी मागणी गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष राजेश परजणे पाटील यांनी केली. या मागणीचा ठराव संघाच्या वार्षिक सभेत मंजूर करून शासनाकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.




संघाची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संघाच्या कार्यस्थळावर झाली. प्रारंभी संस्थापक दिवंगत नामदेवराव परजणे पाटील यांच्या प्रतिमेस अभिवादन करून दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यकारी संचालक चंद्रकांत गाढवे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचले. विषयपत्रिकेवरील सर्व विषय चर्चेने मंजूर करण्यात आले.

यावेळी परजणे म्हणाले, पशुखाद्याचे वाढते दर, जनावरांच्या संगोपनाचा खर्च, हवामानातील बदल, दुष्काळ, दूध उत्पादन खर्च आणि बाजारपेठेतील चढ-उतारांमुळे दूध उत्पादकांवर आर्थिक ताण वाढला आहे. शासनाचे अनुदान नसतानाही गोदावरी दूध संघाने दूध उत्पादकांना प्रतिलिटर ४१ रुपये दर देण्याची भूमिका घेतली आहे. पशुधन वाचविण्यासाठी चारा-पाणी, पशुखाद्य अनुदान, पशुवैद्यकीय सेवा आणि दुग्धव्यवसायाला आर्थिक संरक्षण देणाऱ्या योजना राबवाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

साखर उद्योगाला दिल्या जाणाऱ्या सवलतींच्या धर्तीवर दुग्धव्यवसायालाही शासनाने सवलती द्याव्यात, असेही त्यांनी सांगितले. दूध संकलनापासून प्रक्रिया व विक्रीपर्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून संघाचे कामकाज अधिक पारदर्शक व कार्यक्षम केले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. सभेला उपाध्यक्ष गोपीनाथ केदार, संचालक विवेक परजणे यांच्यासह संचालक मंडळ, दूध संस्थांचे प्रतिनिधी, दूध उत्पादक शेतकरी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालक विवेक परजणे यांनी आभार मानले.

# खजूर झाडांतून आधुनिक फळ बागेचा नवा पर्याय

**सुधीर चव्हाण| राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** राजकारणा सोबतच शेतीत आधुनिक प्रयोग करणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते अब्दुल भैय्या शेख यांनी नेवासे तालुक्यातील देवगाव येथे चक्क एक वेगळाच धाडसी आणि आदर्शव्रत निर्माण केला आहे. शेतामध्ये टिशू कल्चर ची महागडी रोपे लावत शेतकऱ्यांसाठी नवीन प्रयोग सुरू करण्यात आला आहे.

नेवासेच्या मातीत खजूर शेतीचा धाडसी प्रयोग; ५०० खजूर झाडांतून आधुनिक फळबागेचा नवा पर्याय नेवासा तालुक्यातील देवगाव येथे अब्दुल भैय्या शेख यांनी ५०० खजूर झाडांची लागवड करून पारंपरिक शेतीला एक वेगळा आणि आधुनिक पर्याय उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. ऊस, कांदा, सोयाबीन यांसारख्या पारंपरिक पिकांसोबतच शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीची क्षमता, पाण्याची उपलब्धता आणि बाजारपेठेची गरज लक्षात घेऊन फळबागांकडे वळावे, या विचारातून खजूर लागवडीचा प्रयोग करण्यात आला आहे.



कमी पाण्यातील फळपिकाचा पर्याय महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये शेतीसाठी पाण्याचे नियोजन हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. अशा परिस्थितीत तुलनेने कमी पाण्याची गरज असलेल्या आणि कोरड्या व उष्ण हवामानाशी जुळवून घेऊ शकणाऱ्या फळपिकांचा अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली आहे.

खजूर हे उष्ण आणि कोरड्या हवामानाशी संबंधित फळपीक असून योग्य जमीन, पाण्याचे नियोजन, योग्य रोपे आणि शास्त्रीय व्यवस्थापन यांच्या आधारे त्याची लागवड करता येते. त्यामुळे नेवासा परिसरात खजूर लागवडीचा प्रयोग करून स्थानिक हवामान आणि जमिनीच्या परिस्थितीत या पिकाची वाढ व उत्पादन क्षमता तपासण्याचा प्रयत्न अब्दुलभैय्या शेख यांनी केला आहे.

**५०० झाडांची लागवड; फळबागेचा दीर्घकालीन विचार** 'कृषी क्रांती स्वराज्य अ‍ॅग्रो हब'मध्ये ५०० खजूर झाडांची लागवड करण्यात आली आहे. फळबाग ही एका हंगामापुरती मर्यादित नसते. त्यामुळे सुरुवातीची लागवड, झाडांची निगा, पाण्याचे नियोजन, पोषण व्यवस्थापन आणि पुढील उत्पादन यांचा दीर्घकालीन विचार करून हा प्रयोग उभारण्यात आला आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी

## काँग्रेसचे श्रीरामपूर प्रांताधिकाऱ्यांना निवेदन; कारभाराच्या चौकशीचीही मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, त्यांच्या कार्यकाळातील निर्णयांची सखोल चौकशी करावी तसेच दोष आढळल्यास कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटी ग्रामीण उत्तरच्या वतीने करण्यात आली. याबाबत श्रीरामपूरच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप नोंदवत काँग्रेसने मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत.



'द इंडियन एक्स्प्रेस'मधील वृत्ताचा दाखला देत, मुख्य निवडणूक आयुक्त आणि अन्य दोन निवडणूक आयुक्त यांच्यात विविध निर्णयांवर मतभेद झाल्याचा अदावा निवेदनातून करण्यात आला आहे. आयोगातील निर्णय प्रक्रियेबाबत अधिक पारदर्शकता आवश्यक असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. विशेष सखोल पुनरावलोकनाच्या प्रक्रियेत पात्र मतदारांची नावे वगळली जात असल्याचा आरोप काँग्रेसने केला. पात्र नागरिकांचे नाव मतदार यादीतून वगळले जाणे हा लोकशाही प्रक्रियेच्या दृष्टीने गंभीर विषय असल्याचे सांगत मतदार याद्यांच्या प्रक्रियेत पारदर्शकता व जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या 'मतदारांची नावे वगळण्याच्या' मुद्द्याचाही निवेदनात उल्लेख करण्यात आला. निवडणूक आयोगाच्या कारभाराबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, प्रदेश सचिव प्रभावती घोगरे, संगमनेर तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, कार्याध्यक्ष अमोल शेलकर, अभिजित लुनिया यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## द•ख•ल

### प्रवरा अभियांत्रिकी महाविद्यालयात आज 'रोजगार महाकुंभ'

**लोणी** : तरुणांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयात मंगळवार, दि. २९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र' आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यात नामांकित उद्योग व कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून इच्छुक युवक-युवतींना थेट मुलाखतीची संधी मिळणार आहे. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील व सहसचिव भारत घोगरे यांच्या उपस्थितीत मेळाव्याचा प्रारंभ होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी दिली. रोजगारासोबत कौशल्य विकास, प्रशिक्षण, स्टार्टअप, उद्योजकता आणि अप्रेंटिसशिपच्या संधींबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी पूर्वनोंदणी करावी. मेळाव्याच्या ठिकाणीही थेट मुलाखतीची सुविधा उपलब्ध असून युवक-युवतींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### सव्यसाचि गुरुकुलमच्या विद्यार्थ्यांची संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराला भेट



**नेवासा** : प्राचीन युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी समर्पित असलेली कोल्हापूर जिल्ह्यातील प्रसिद्ध सव्यसाचि गुरुकुलमचे प्रधानाचार्य लखन जाधव यांच्यासह तेथील आचार्य व विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात येऊन पैस खांबाचे दर्शन घेतले. पुरातन काळात समृद्ध भारत उभा राहण्यामध्ये गुरुकुल शिक्षण पद्धतीचा फार मोठा वाटा होता. गुरु शिष्य परंपरेतून आकार देणारी, जीवन समृद्ध करणारी शिक्षण प्रणाली प्रत्यक्षात आणण्याचे मोठे काम सव्यसाचि गुरुकुल यांच्या माध्यमातून होत आहे. गुरुकुलात सुरू असलेल्या शिक्षण उपक्रमाची यावेळी माहिती घेण्यात आली. यावेळी लखन जाधव यांचा सत्कार शिवकालीन मर्दानी आखाडा नेवासाचे प्रमुख मास्टर सुरेशकुमार लव्हाटे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अनंतराव नळकांडे,संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे सेवेकरी शिवाजी आप्पा होन,नेवासा नगरीचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले उपस्थित होते.

### लोहगाव माध्यमिक विद्यालयाचे मैदानी स्पर्धेत यश



**शिंगणापूर** : तालुका स्तरीय क्रिडा स्पर्धा नुकत्याच मुळा एज्युकेशन सोसायटीच्या भव्य मैदानावर पार पडल्या. या स्पर्धेत लोहगाव येथील संत एकनाथ महाराज माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.या स्पर्धामध्ये १४वर्ष वयोगटात पूजा लक्ष्मण राशिनकर-४००मीटर धावणे प्रथम,अराध्या दादासाहेबअशा पटारे-६००मीटर धावणे प्रथम, १७वर्ष वयोगटात लाहोरे पूजा सोपान २००मीटर धावणे द्वितीय तसेच ४०० मीटर धावणे प्रथम, संध्या ढेरे- ८०० मी धावणे प्रथम, खंडागळे करण सुनिल भालाफेक प्रथम.अशाप्रकारे यश मिळवून विद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली. या सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक चिंधे, व्ही.बी.शिंदे, मोटे, सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मुळा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष उदयन गडाख सचिव लोंढे यांनी अभिनंदन केले.

# लोणीत शुक्रवारपासून 'बिल्डिंग प्रवरा'; ७७५ विद्यार्थ्यांचा सहभाग १७२ स्टॉल्सची उभारणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर / झरेकाठी** : विद्यार्थ्यांना केवळ पदवीचे शिक्षण न देता त्यांच्यात उद्योजकतेची जाणीव, व्यावहारिक ज्ञान, आत्मविश्वास आणि स्वतः च्या पायावर उभे राहण्याची क्षमता निर्माण करण्याच्या उद्देशाने लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने २ ते ४ ऑक्टोबरदरम्यान 'बिल्डिंग प्रवरा'अंतर्गत बिझनेस एक्स्पो आयोजित करण्यात आला आहे. एक्स्पोचा शुभारंभ २ ऑक्टोबर रोजी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, शालिनीताई विखे पाटील व डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.



सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत एक्स्पो सर्वांसाठी खुला राहणार आहे. या उपक्रमात तब्बल ७७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असून १७२ स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. विविध उत्पादने, नावीन्यपूर्ण कल्पना व व्यवसाय संकल्पना विद्यार्थी प्रत्यक्ष मांडणार आहेत. व्यवसायाचे नियोजन, उत्पादन किंवा सेवा ग्राहकांपर्यंत पोहोचविणे, बाजारपेठेचा अभ्यास तसेच आर्थिक व्यवहार यांचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

अहिल्यानगरचा विद्यार्थी रोजगार शोधणारा नव्हे, तर रोजगार निर्माण करणारा उद्योजक व्हावा, यासाठी योग्य संधी व व्यासपीठ देणे हा 'बिल्डिंग प्रवरा'चा उद्देश आहे, अशी माहिती संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# कर्मवीर आण्णांनी गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण उपलब्ध केले : आ. रोहित पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोळपेवाडी** : रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर अण्णांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केवळ शाळा उभारण्यासाठी केली नाही, तर गोरगरीब आणि बहुजन समाजातील मुलांच्या आयुष्याला दिशा देण्यासाठी केली. 'गोर गरीबांची मुले शिकली पाहिजे, पुढे गेली पाहिजे' हा विचार घेऊन त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाची चळवळ उभी केली आणि खेडोपाडी ज्ञानाची दारे खुली केली असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष आ. रोहित पवार यांनी केले. कोपरगाव मतदार संघातील राहाता तालुक्यातील पुणतांबा येथील न्यू इंग्लिश स्कूल व वि. ल. धनवटे पाटील कनिष्ठ विद्यालय, पुणतांबा येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती व विद्यालयाच्या नूतन इमारत उद्घाटन सोहळा रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष आ. रोहित पवार व माजी अध्यक्ष आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी होते. यावेळी आ. आशुतोष काळे म्हणाले की, ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आणि मजूर कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली करून देण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. शिक्षणाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावले.कर्मवीर भाऊराव पाटील आणि कर्मवीर शंकररावजी काळे या दोन कर्मवीरांच्या विचारांमुळे ग्रामीण भागात सरस्वती आणि लक्ष्मी एकत्र नांदू लागल्या व ग्रामीण भागातील शेतकरी,कष्टकरी आणि गोरगरिबांच्या जीवनात अमुलाग्र बद्दल झाला असल्याचे त्यांनी सांगितले. कर्मवीर शंकररावजी काळे यांनी आयुष्यभर कारखान्याच्या माध्यमातून व वैयक्तिक पातळीवर रयत शिक्षण संस्थेच्या विस्तारासाठी शेवटच्या श्वासापर्यंत मोठे योगदान दिले असून राज्यासह कर्नाटक राज्यात देखील संस्थेचा विस्तार झालेला आहे.

त्यामुळे त्यांना रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी काम करण्याची संधी मिळाली. त्यामाध्यमातून स्व.यशवंतराव चव्हाण, स्व.वसंतदादा पाटील,आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या सोबत काम करण्याची संधी त्यांना मिळाली. त्याप्रमाणे माजी आमदार अशोकराव काळे आणि मला देखील पवार साहेबांनी रयत शिक्षण संस्थेची सेवा करण्याची संधी दिली.कर्मवीर भाऊराव पाटील आणि कर्मवीर शंकररावजी काळे यांच्या आदर्श विचारांवर माझी वाटचाल सुरु असून रयत संस्थेच्या शाळांना येणाऱ्या अडचणी सोडवून मदत करण्याचा वारसा यापुढेही जपणार असल्याचे आ.आशुतोष काळे यांनी सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक कडनोर यांनी केले.

# तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत अमृतवाहिनीच्या संघांचा दणदणीत विजय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांच्या संयुक्त विदयमाने तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा २०२६-२७ चे आयोजन सह्यादी जूनियर कॉलेज, संगमनेर येथे करण्यात आले. या स्पर्धेत अमृतवाहिनी मॉडेल स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या १७ वर्षे मुले, १९ वर्षे मुले आणि १९ वर्षे मली या तिन्ही गटांतील संघांनी उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम सामन्यात विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला असल्याची माहिती शाळेचे प्राचार्य आशिष कुमार यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना ते पुढे म्हणाले की, अमृतवाहिनी शिक्षण संस्थेने शिक्षणाबरोबरच विविध स्पर्धांमध्ये घडणारे विद्यार्थी तयार व्हावे यासाठी विशेष परिश्रम घेतले आहे त्याचाच एक भाग म्हणून १७ वर्षे मुले या गटात कर्णधार पंकज गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली भूषण चव्हाण, प्रेम गवळी, अथर्व देवरासे, आयुष खाने, रोहित गायकवाड, मेघराज भोये. साई चौरे, हिमांश भरसाट, प्रशांत महाले, अमित घारे व सुरज बन्सी यांनी उत्कृष्ट खेलाचे प्रदर्शन केले संघाने अंतिम सामना जिंकत प्रथम क्रमांक मिळवला.

१९ वर्षे मुले या गटात कर्णधार धनेश बागुल यांच्या नेतृत्वाखाली कल्पेश सातपुते, ओंकार गीते, अतुल आवारी, यशराज देशमुख, सौरभ टोपले, वेदांत महाले, निखिल गायकवाड, राजू अवतार, तुकाराम गावित, चंदू पीठे व राधेश्याम सुतार यांनी संघाला प्रथम क्रमांकाचे विजेतेपद मिळवून दिले. तर १९ वर्षे मुली या गटात कर्णधार अश्विनी भोये यांच्या नेतृत्वाखाली जागृती सातपुते, कावेरी चौधरी, जानवी चौधरी, जयश्री धूम, योगेश्वरी भोये, निशा पवार, मयुरी पवार, लीना भरसट, कविता शिंदे व मृणाल भालेराव यांनी शानदार कामगिरी करत अंतिम सामना जिंकला आणि प्रथम क्रमांक पटकावत शाळेचे नाव उज्वल केले. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक रविंद्र कदम, रोहित गाडे, जयराम दूशिंग व सौ वृषाली भागवत यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'आले काढणी' यंत्राच्या डिझाईनला भारत सरकारचे पेटंट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत कृषी महाविद्यालयातील प्रा. अमोल खडके यांनी विकसित केलेल्या 'आले काढणी यंत्राच्या डिझाईन'ला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट मिळाले आहे.

डी. वाय. पाटील कृषी व तांत्रिक विद्यापीठ, तळसंदे येथील कृषी अभियांत्रिकी विभागाचे डॉ. अमोल गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधन करण्यात आले.



आले काढणीसाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ, वेळ व मजुरी खर्च होत असल्याने काढणी प्रक्रिया यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून सुलभ करण्याच्या उद्देशाने या यंत्राची संकल्पना व डिझाईन विकसित करण्यात आले. प्रात्यक्षिक चाचण्यांमध्ये या यंत्राद्वारे सुमारे तीन तासांत एक एकर आले पिकाची काढणी करण्याची क्षमता आढळली.

पारंपरिक पद्धतीने याच क्षेत्राची काढणी करण्यासाठी सुमारे दोन दिवसांचा कालावधी व जवळपास ४० मजुरांची आवश्यकता भासते. या यंत्रामुळे वेळ, मनुष्यबळ व उत्पादन खर्चात बचत होण्याची शक्यता असून, कृषी क्षेत्रातील यांत्रिकीकरणाला चालना मिळणार आहे. हे पेटंट पुढील २० वर्षांसाठी वैध आहे. प्रा. खडके यांच्या संशोधनाबद्दल राधाकृष्ण विखे पाटील, शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, डॉ. सुस्मिता विखे पाटील, भारत घोगरे, डॉ. शिवानंद हिरेमठ व डॉ. उत्तमराव कदम यांनी अभिनंदन केले.


## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, **आमचे पक्षकार सौ. आशाताई संजीव गरुड, रा.बोडखे, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असुन त्यांची मौजे. शेवगाव येथे गट. नं. 1044/1 मध्ये जुनी मिळकत नंबर नगरपरिषद, शेवगाव 4480/4 असुन **नवीन मिळकत नंबर** Z1W1005973 गट लेव्हल बांधकाम 20x50 चौ. फुट म्हणजे 1000 चौ. फुट असुन आज रोजी रे. मु. नं. 343/2026 मधील कोर्ट अवॉर्ड तडजोड आदेशाप्रमाणे त्यांचे मालकी व कब्जात आहे. सदर जागा मिळकतीवर त्यांना आर.सी.सी. पद्धतीने कायमस्वरूपी बांधकाम करायचे आहे. त्यासाठी या जाहीर प्रगटनाद्वारे सुचविण्यात आलेले आहे की, जर या मिळकतीबाबत कोणाचे काही हितसंबंध असतील अथवा काही तक्रार असेल तर त्यांनी १५ दिवसाचे आत आमचेकडे हरकती कळवाव्यात. सदर मिळकतीबाबत आपले काही म्हणने अथवा तक्रार नाही, असे समजुन आमचे पक्षकार सदर जागा मिळकतीवर नगरपरिषद बांधकाम परवाना घेऊन त्यांचे सोयीप्रमाणे बांधकाम पूर्ण करतील. त्यानंतर कोणी तक्रार अथवा हरकत घेतल्यास आमचे पक्षकार त्यास उत्तर देण्यास बांधील अथवा जबाबदार राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी. करिता जाहीर प्रगटन असे.

ता. २८/०९/२०२६,

मार्फत
सही/-
**ॲड. डी. बी. आघाव**
बी.कॉम.एल.एल.बी.
**दिवाणी न्यायालय, शेवगाव**

शिक्का

सही/-
**जाहीर प्रगटन देणार**
**आशा सजीव गरूड**



## जाहिर नोटीस

जा क्र./५०९/२०२६
नि.नं. ३६
ॲड. टी. बी. ढोकणे
नेमलेली ता. ०६-११-२०२६

नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब, सि.डी. यांचे कोर्टात
रे.द.नं.-५६/२०२५

धनको
पृथ्वीराज दत्तात्रय साबळे
ऋणको
शोभाबाई शेषराव साबळे वगैरे
नोटीस सि.पी.सी. ऑर्डर २१ रुल, २२ प्रमाणे :-

प्रति,
३) रमेश बाजीराव पहिलवान,
४) सुरेश बाजीराव पहिलवान,
५) मिना मधुकर खर्चने
६) कविता अनिल घोडगे
७) छबुबाई बाजीराव पहिलवान,
सर्व रा. मजले शहर, ता. शेवगांव, जि. अहिल्यानगर
ह.मु. मुंबई ता.जि. मुंबई, मो.नं ९७६८२०७२७३/८८७९८३१८७८

ज्याअर्थी वर नामनिर्दिष्ट केल्याप्रमाणे धनको पृथ्वीराज दत्तात्रय साबळे यांनी रे.मु.नं. ७१८/२०१९ चे हुकुमनाम्यानुसार अंमल बजावणीसाठी अर्ज दाखल केलेला आहे. याद्वारे तुम्हाला ताकीद देण्यात येते की, तारीख ०६-११-२०२६ रोजी मध्यान्ह ११ वाजता या न्यायालयात तुम्ही सदर अर्जास कारण दाखविण्यासाठी तुम्ही स्वतः जातीने अथवा आपण नियुक्त केलेल्या वकिलांमार्फत हजर होवुन सदर अर्जासंबंधीत कागदपत्र व दस्तऐवजासह हजर राहावे तसे करण्यास तुम्ही चुकला तर, उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी करुन निर्णय देण्यात येईल,

आज दि.२४/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**तयार करणार**
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

**हुकुमावरुन**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर**


# सूतगिरणीसाठी आणखी ३१ एकर जागा घेण्याचा मानस : सभापती अरुण तनपुरे

## राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न



बाजार समितीला अहवाल सालात २ कोटी ८९ लाखांचा वाढावा मिळाला आहे. डॉ.दादासाहेब तनपुरे यांनी शेतकरी केंद्रबिंदू ठेवून संस्थेची स्थापना केली. संस्थेने कोणतेही कर्ज न घेता स्वखर्चातून राहुरी व वांबोरी आवारात १८ कोटींच्या भौतिक सुविधा निर्माण केल्या आहेत. राहुरी नगर परिषदेची पावणेतीन एकर जमीन आठ कोटींना खरेदी केली आहे. तेथे गाळे व भाजीपाला बाजार सुरू केला जाईल.

**अरुण तनपुरे, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती राहुरी**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवूनच कारभार केलेला आहे. राज्यात बोटावर मोजणे इतक्या बाजार समितीच्या पंगतीत राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीचा नंबर लागलेला असल्याचे प्रतिपादन समितीचे सभापती अरुण तनपुरे यांनी केले. रविवारी बाजार समितीची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली त्यावेळी ते बोलत होते. सभापती तनपुरे म्हणाले की बाजार समितीने स्व निधीतून जागा घेऊन विस्तार केलेला आहे.

त्या जागेत व्यापारी संकुल उभारून तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सूतगिरणीची १३ एकर जागा खरेदी करून तेथेही विस्तार केला जात आहे लवकरच कापूस खरेदी करून जिनिंगचा उपयोग शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी होणार आहे. शासकीय कापूस खरेदीचा लाभही शेतकऱ्यांना होईल. गेल्या ३० वर्षा पूर्वी माजी खासदार प्रसाद तनपुरे यांच्या संकल्पनेतून कांदा लिलावास प्रारंभ करण्यात आला होता.

आज तालुक्यात ऊस पिका खालोखाल कांदा पीक घेतले जाते त्यामुळे बाजार समितीही आर्थिक दृष्ट्या सक्षम झाली. त्यातूनच शेतकरी कामगार व्यापारी हमाल मापाडी यांच्यासाठी विविध योजना आणता आल्या ही सर्वात मोठी जमेची बाजू आहे. शेतकऱ्यांसाठी सवलतीच्या दरात भोजन योजना व्यापाऱ्यांसाठी विस्तारित जागा रस्ते लाईट स्वच्छता पिण्याची पाणी यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. ज्या उद्देशासाठी दिवंगत डॉ .दादासाहेब तनपुरे यांनी बाजार समितीची स्थापना केली तो उद्देश सफल झाल्याचे मानसिक समाधान सर्वांनाच आहे.

संस्थेच्या संचालक मंडळात एक वाक्यता असल्यानेच उत्तम कारभार करू शकलो असे मतही श्री तनपुरे यांनी व्यक्त केले. स्थैर्य असले तर संस्थाही नावारूपास येतात याचे उत्तम उदाहरण राहुरीची बाजार समिती ठरली आहे असे नमूद केले. राहुरी शहरालगत पावणेतीन एकर जागा राहुरी सूतगिरणीची साडेतेरा एकर जागा घेण्यात आली असून आणखी ३१ एकर जागा खरेदी करण्याचा मानस त्यांनी बोलून दाखविला त्या दृष्टीने प्रयत्न चालू असल्याचे सांगितले. प्रेरणा अर्थ परिवाराचे संस्थापक सुरेश वाबळे, कारखान्याचे संचालक अशोक उर्हे, बाजार समितीचे उपसभापती महेश पानसरे, संचालक दत्तात्रय कवाणे, बाळासाहेब खुळे, गोरक्षनाथ पवार, शामराव निमसे, रखमाजी जाधव, मधुकर पवार, सुरेश बाफना, दत्तात्रय शेळके, रामदास बाचकर, चंद्रकांत पानसंबळ, सुभाष डुक्रे, मारुती हारदे, मंगेश गाडे, शारदा आढाव, भाऊसाहेब खेवरे उपस्थित होते. सचिव भिकादास जरे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचन केले.

व्यापारी लक्ष्मण गागरे, शेतकरी किशोर जाधव, भाऊसाहेब गुंजाळ, रवींद्र आढाव, विजय माळवदे, सुरेश वाबळे आदींनी चर्चेत भाग घेतला. सभेपुढील सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले.

# डॉ. ढगे यांची दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी ५० हजारांची मदत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : तालुक्यातील खेडलेकाजळी गावचे भूमिपुत्र तथा कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे यांनी दुष्काळसदृश परिस्थितीची जाणीव ठेवत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी सामाजिक बांधिलकीतून ५० हजार रुपयांची वैयक्तिक मदत केली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील टंचाई परिस्थितीच्या अनुषंगाने नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या टंचाई आढावा बैठकीत डॉ. ढगे यांनी ५० हजार रुपयांचा धनादेश अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सुपूर्त केला. दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकरी व नागरिकांना आवश्यक मदत आणि दिलासा मिळावा, यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून विविध उपाययोजना करण्यात येत असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. या पार्श्वभूमीवर डॉ. अशोकराव ढगे यांनी पुढाकार घेत शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आपला खारीचा वाटा उचलला.यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी तसेच नेवासा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांच्यासह संबंधित अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी समाजातील सक्षम व्यक्ती, संस्था व नागरिकांनी पुढे येऊन आपल्या परीने मदतीचा हात द्यावा, असे आवाहन डॉ. अशोकराव ढगे यांनी केले आहे. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे परिसरातून कौतुक होत आहे.

## पान १ वरुन

### एमआयडीसीच्या जमिनीवर धनदांडग्या शेतकऱ्यांचे अतिक्रमण,आदेश कागदावरच

वापरही केला जात आहे. एवढ्या प्रचंड मोठ्या क्षेत्रावर हे साम्राज्य सुरू असताना एमआयडीसी प्रशासन अंधारात कसे राहू शकते? शासकीय जमिनीचा वापर करून दरवर्षी लाखो रुपयांचा 'आर्थिक मलिदा' लाटला जात असताना अधिकारी मूग गिळून का बसले आहेत? या संपूर्ण काळ्या कारभारामागे राजकीय वरदहस्त आणि प्रशासकीय अभय कुणाचे आहे, याचा पर्दाफाश होणे गरजेचे आहे.

कारवाई कागदावर, प्रत्यक्ष जागेवर कांदा पिकाची हिरवळ! काही दिवसांपूर्वीच एमआयडीसी प्रशासनाने अतिक्रमण हटवण्याचे आदेश काढले होते. मात्र, अधिकाऱ्यांचे हे आदेश केवळ शासकीय फाइलींची शोभा वाढवण्यासाठीच उरले आहेत का, अशी स्थिती निर्माण झाली आहे. आदेश निघाल्यानंतरही प्रत्यक्ष जागेवर कारवाई होण्याऐवजी पुन्हा १० ते १५ एकरावर कांद्याची नवी लागवड उभी राहिली आहे. हा प्रकार केवळ जमिनीवरील अतिक्रमणाचा नसून, थेट प्रशासनाच्या कार्यक्षमतेला आणि कायदेशीर अस्तित्वाला धनदांडग्यांनी दिलेले खुले आव्हान आहे.

एमआयडीसी प्रशासनाने केवळ कागदी नोटिसा पाठवून हात वर करू नयेत. अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन संपूर्ण ६२४ एकर क्षेत्राचे तातडीने मोजमाप करावे आणि डाळिंब, लिंबू, बाजरी, ऊस, कांदा, मका या पिकांचे पंचनामे करून अतिक्रमण धारकांवर कारवाई करावी.

#### अजितदादांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी माळेगाव कारखाना देशात अग्रस्थानी नेऊ : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

जाईल, असे सांगून त्या म्हणाल्या की०, यंदा गेल्या अनेक वर्षांच्या तुलनेत उच्चांकी भाव देण्यात आला आहे. पुढील वर्षीही शेतकऱ्यांना चांगला भाव देण्यासाठी प्रयत्न केले जातील. कारखान्याच्या कारभारात काटकसरीला प्राधान्य देतानाच शेतकरी आणि कारखान्याच्या हिताचा समतोल राखला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.बारामती तालुयात दुष्काळ जाहीर झाल्याचा उल्लेख करत त्यांनी दुष्काळसदृश परिस्थितीत पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले. ऊस वाहतूक संघटनेच्या अडचणी सोडविण्यासाठीही योग्य ती कार्यवाही केली जाईल. कारखाना आणि शेतकरी हितासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याची ग्वाही त्यांनी दिली.माळेगाव कारखान्याच्या अध्यक्षा म्हणून मी शेतकऱ्यांच्या पाठीशी कायम राहीन. अजितदादांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांच्या विचारांनी आणि त्यांनी दाखविलेल्या मार्गावरून आपण एकजुटीने पुढे जाऊया, असे आवाहन सुनेत्रा पवार यांनी केले.

## नेवासा आगारातील वाहतूक नियंत्रक विजय लाड व वाहक जितेंद्र शेजुळ सेवानिवृत्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या नेवासा आगारातील वाहतुक नियंत्रक विजय लाड हे आपल्या वाहक ते वाहतूक नियंत्रक या पदावरील ३६ वर्षे सेवेतुन तर वाहक श्री जितेंद्र शेजुळ हे २७ वर्ष वाहक पदावरील महामंडळाच्या सेवेतुन सेवानिवृत्त झाले नेवासा आगारात आयोजित सेवापूर्ती कार्यक्रमात त्यांचा कामगार बांधव व प्रवासी संघटनेच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला

यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार प्रमुख संदीप ढवळे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रवासी संघटनेचे अध्यक्ष अनिल पा. ताके हे प्रमुख उपस्थित होते.यावेळी वाहक कामगार नेते अनिल जरे पाटील यांनी सूत्रसंचालन केले तर कामगार नेते रमेश दाणे यांनी आभार मानले

या कार्यक्रमाला सौ.गीता विजय लाड,सौ.शेजुळ वहिनी ,सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रक सोमनाथ गव्हाणे, वाहन परीक्षक राजेंद्र ठाकर,कामगार नेते अनिल टाके, सुनील वालतुरे,चालक विष्णू घुले,आव्हाड,वाहक विजय सोनवणे आदी उपस्थित होते.

## आजोबांच्या स्मरणार्थ वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी ३१ हजारांची मदत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी ।** कै. कोंडाजी दगडू शेळके यांच्या स्मृती चिरंतन जपताना, त्यांचे नातू, प्रसिद्ध औषध विक्रेते व तरुण उद्योजक हर्षल खेमनर (आश्वी बु.) यांनी रयत शिक्षण संस्थेच्या येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी ३१ हजार रुपयांची देणगी देत संवेदनशीलतेचे अनोखे दर्शन घडवले आहे. आगामी हिवाळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना झोपण्याच्या साहित्याची व्यवस्था व्हावी म्हणून त्यांनी तातडीने हा मदतीचा हात पुढे केला.

मागील आठवड्यात वसतिगृहातील काही विद्यार्थी आजारी पडल्याची माहिती मिळताच हर्षल खेमनर यांनी डॉक्टरांसमवेत जाऊन औषधोपचार पुरवत विद्यार्थ्यांची विचारपूस केली होती. या भेटीदरम्यान विद्यार्थी थंड फरशीवर झोपत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. आगामी काळात थंडीचा कडाका वाढणार असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येऊ नये, या भावनेतून त्यांनी तात्काळ विद्यालयाचे प्राचार्य, पर्यवेक्षक व वसतिगृह प्रमुखांशी संवाद साधला.

विद्यार्थ्यांना कॉट व बिछान्यांची गरज असल्याचे लक्षात येताच खेमनर यांनी क्षणाचाही विलंब न लावता ३१ हजार रुपयांचा निधी शालेय प्रशासनाकडे सुपूर्त केला. स्वतःच्या आजोबांच्या स्मरणार्थ नातवाने थेट गरजू विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी निगडित मूलभूत गरजेसाठी दिलेली ही देणगी शैक्षणिक वर्तुळात कौतुकाचा विषय ठरली आहे. न्यू इंग्लिश स्कूलच्या ज्युनिअर कॉलेज इमारतीच्या भूमिपूजन सोहळ्यात रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी तसेच विभागीय अध्यक्ष आ. रोहित पवार यांच्या हस्ते हर्षल खेमनर यांचा सत्कार करण्यात आला.

# समता युवा संसदेत विद्यार्थ्यांनी घेतला लोकशाहीचा प्रत्यक्ष अनुभव

## डिजिटल युगातील आव्हानांवर अभ्यासपूर्ण चर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित 'समता युवा संसद २०२६' उपक्रमातून विद्यार्थ्यांना लोकशाहीची कार्यपद्धती प्रत्यक्ष अनुभवता आली. १८ व १९ सप्टेंबर रोजी झालेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरांचा तास, शून्य प्रहर, धोरणात्मक प्रस्ताव, विधेयक मांडणी, संसदीय चर्चा आणि पत्रकार परिषद अशा विविध टप्प्यांत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

'भारतातील मुलांसाठी अधिक सुरक्षित आणि जबाबदार डिजिटल वातावरण निर्माण करणे' हा युवा संसदेचा मध्यवर्ती विषय होता. इंटरनेटचा वापर, समाजमाध्यमांचा गैरवापर, कृत्रिम बुद्धिमत्ता, बनावट व्हिडिओ, मुलांची ऑनलाइन गोपनीयता आणि डिजिटल जागरूकता या विषयांवर विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण चर्चा करून विविध उपाययोजना सुचविल्या. प्रश्न विचारणे, आपले मत मांडणे, विरोधी मतांचा आदर करणे आणि लोकहिताचा विचार करून निर्णय घेणे, या लोकशाही मूल्यांचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला.

कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे यांनी विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या स्पर्धेत पुढे जाण्याऐवजी विचार करणारे, प्रश्न विचारणारे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेले नागरिक बनणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्राचार्य समीर अत्तार यांनी लोकशाहीची मूल्ये पुस्तकातून शिकण्याबरोबरच ती प्रत्यक्ष अनुभवणे महत्त्वाचे असल्याचे नमूद केले.

युवा संसदेत उत्कृष्ट संसदपटू म्हणून नीती रोहरा, अद्वैत पवार आणि ॲना वेस्ली यांची निवड करण्यात आली. दूरदर्शी विचारवंत म्हणून धैर्य डोडीया, आर्यन पवार व दृष्टी लोकचंदानी, तर उत्कृष्ट समीक्षक म्हणून निकेश कुमावत, रुही फुलसुंदर व रुद्र राठोड यांचा गौरव करण्यात आला. क्रिया पोरवाल, ईश्वरी महाजन आणि अवधूत देवकर यांनाही



विशेष सहभागाबद्दल सन्मानित करण्यात आले.कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे, प्राचार्य समीर अत्तार आणि उपप्राचार्य मोहिनी जगताप यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पूर्वी श्रीवास, मेघराज काकडे, अमोल कडनोर व शुभम औताडे यांनी परिश्रम घेतले.

## सेवा संकल्प अभियानांतर्गत नदी पुलावर स्वच्छता मोहीम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुळा नदीपात्राचे प्रदूषण रोखण्यासाठी सेवा संकल्प अभियानांतर्गत सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कृषी विद्यापीठातील एनसीसी व हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी मुळा नदी पुलावर स्वच्छता मोहीम राबविली. पुलाच्या कठड्याला बांधलेल्या प्लास्टिक पिशव्या काढून त्यांची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.

नदीपात्रात निर्माल्य अथवा इतर कचरा टाकण्यासाठी नागरिकांकडून प्लास्टिक पिशव्यांचा वापर केला जातो. अनेकदा या पिशव्या पुलाच्या कठड्याला बांधून ठेवल्या जातात. वाऱ्यामुळे त्या नदीपात्रात वाहून जाऊन प्लास्टिक कचरा वाढण्याबरोबरच नदी व परिसराचे विद्रूपीकरण होत आहे. या समस्येची दखल घेत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबविली.

मुख्याध्यापक अरुण तुपविहिरे, उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे, एनसीसी अधिकारी संतोष जाधव व हरित सेना सचिव तुकाराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सात विद्यार्थी व चार शिक्षकांनी ही मोहीम राबविली. यावेळी पुलाच्या कठड्याला बांधलेल्या सर्व प्लास्टिक पिशव्या काढून कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.

मुख्याध्यापक तुपविहिरे यांनी नागरिकांनी पुलाच्या कठड्याला प्लास्टिक पिशव्या बांधू नयेत, तसेच नगरपरिषदेने उपलब्ध केलेल्या निर्माल्य संकलन केंद्रांवर निर्माल्य जमा करावे, असे आवाहन केले.

युवराज धोंडे, कृष्णा सोनवणे, हर्षदा गवळी, समीक्षा तांबे, समृद्धी पिंगळे, आकांक्षा लांडगे व सिद्धांत राजे मेटकर यांनी मोहिमेत सहभाग घेतला.

## समृद्धी महामार्गावर टोमॅटोचा ट्रक पलटी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** वैजापूरहून नागपूरच्या दिशेने टोमॅटो घेऊन भरधाव वेगाने जाणारा ट्रक समोरील वाहनाला धडक दिल्यानंतर पलटी झाल्याची घटना रविवारी मध्यरात्री समृद्धी महामार्गावरील जांबरगाव शिवारात घडली. या अपघातात ट्रकमधील टोमॅटो महामार्गावर मोठ्या प्रमाणात पसरल्याने मालाचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक क्र (एमएच ४७ बीके ८३३७) हा टोमॅटो भरून वैजापूरहून नागपूरकडे जात होता.जांबरगाव शिवारात चॅनेल क्र ४८१.७ वर चालकाने समोरील (एचआर ५५ बीई ९४११) या वाहनाला मागून जोरदार धडक दिली.या धडकेनंतर ट्रकवरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि ट्रक महामार्गावर पलटी झाला.



ट्रक पलटी होताच त्यातील टोमॅटोचे क्रेट्स फुटून शेकडो किलो टोमॅटो महामार्गावर पसरले. त्यामुळे रस्त्यावर टोमॅटोचा अक्षरशः खच पडला होता. अपघातामुळे टोमॅटो तसेच क्रेट्सचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. दरम्यान, ट्रक चालक दारूच्या नशेत असल्याचे सांगण्यात येत असून, अपघातानंतर तो घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती आहे. या घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणेने घटनास्थळी धाव घेतली. अपघातामुळे काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाला.

## निलंबन रद्द करून निष्पक्ष चौकशी करा, सुलताना शेख यांची जि.प. सीईओंकडे मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील देसवंडी येथील शिरसाटवस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील उपशिक्षिका सुलताना जावेद शेख यांनी आपल्यावरील निलंबनाची कारवाई रद्द करून संपूर्ण प्रकरणाची त्रयस्थ वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे. पत्रकार परिषदेत त्यांनी आपल्याविरुद्ध करण्यात आलेल्या तक्रारींबाबत भूमिका मांडली.

सहकारी शिक्षक आबा दगडू कडूस यांनी खोट्या तक्रारी करून आपल्याविरुद्ध कटकारस्थान केल्याचा आरोप शेख यांनी केला. शाळेतील कामकाजावरून मतभेद झाल्यानंतर संबंधित शिक्षकाने पालकांमध्ये आपल्याबाबत गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे. विद्यार्थ्यांना मारहाण झाल्याच्या घटनांबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले असून, या घटनांचे पुरावे शाळेतील सीसीटीव्ही चित्रफितींमध्ये असल्याचा दावा केला आहे. शेख किरकोळ रजेवर असताना २८ जुलै रोजी संबंधित शिक्षकाने शाळेच्या कार्यालयात प्रवेश करून कपाटाच्या चाव्या घेतल्या आणि शासकीय कागदपत्रे ठेवलेले कपाट उघडून कागदपत्रांची उचकापाचक केल्याचा आरोप त्यांनी केला. ही घटना सीसीटीव्हीमध्ये नोंदली असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यानंतर २९ जुलै रोजी सीसीटीव्ही यंत्रणेत छेडछाड झाल्याचा आरोप त्यांनी केला. सीसीटीव्हीचा संकेतशब्द बदलल्यामुळे काही दिवस चित्रफिती पाहता आल्या नाहीत. त्यानंतर २७, २८ व २९ जुलैच्या चित्रफिती तपासल्या असता काही भाग उपलब्ध नसल्याचे शेख यांनी म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर सीसीटीव्ही यंत्रणेतील मूळ नोंदी, ध्वनिचित्रमुद्रक व संगणकीय नोंदींची तांत्रिक तपासणी करावी, तसेच संबंधित शिक्षकासह प्रकरणातील अधिकाऱ्यांच्या भूमिकेची स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी शेख यांनी केली आहे.

## आत्मा मालिक शैक्षणिक संकुलात ''सेवा संकल्प अभियानांतर्गत'' कार्यशाळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव :** शैक्षणीक गुणवत्तेवर लक्ष केंद्रीत करून शिक्षणाचा दर्जा आणखी वाढवीण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे. गुणवत्तावाढीसाठी शिक्षण विभागाच्या विविध योजना कार्यरत आहेत. विविध शिष्यवृत्ती परीक्षा, स्पर्धा परीक्षा, अप्रगत विद्यार्थ्यांच्या साठी विविध उपाय योजना, यु-डायस, सरल पोर्टल, विविध समित्या आदि विषय महत्वाचे आहेत. असे प्रतिपादन माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल राबविण्यात येणाऱ्या सेवा संकल्प अभियानांतर्गत आत्मा मालिक शैक्षणीक संकुलात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. शिक्षणाधिकारी योजना बाळासाहेब बुगे, उपशिक्षणाधिकारी संजय सरोदे, गटशिक्षणाधिकारी शबाना शेख, अभय कुमार वाव्हळ, धुमाळ, विस्तार अधिकारी सुरेश ढवळे, राहता, कोपरगाव, संगमनेर, श्रीरामपूर व अकोले या तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते. कार्यशाळेचे उद्घाटन शिक्षणाधिकारी (योजना )बाळासाहेब बुगे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व मान्यवरांचे स्वागत आत्मा मालिकेचे प्राचार्य निरंजन डांगे यांनी केले,

## 'सरकारने शेतकऱ्यांचा अंत पाहू नये' खा. डॉ कल्याण काळे यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील शंभर टक्के शेतकरी दुष्काळाच्या संकटात सापडला आहे. त्यामुळे सरकारने तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात प्रति हेक्टर एक लाख रुपयांची मदत जमा करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. आता सरकारने शेतकऱ्यांचा अंत पाहू नये असे प्रतिपादन जालन्याचे खासदार डॉ कल्याण काळे यांनी रविवारी वैजापूर येथे केले. शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा न झाल्यास सात ऑक्टोबरला विभागीय स्तरावर जिल्हा काँग्रेस समितीतर्फे मोठा मोर्चा काढण्याचे नियोजन आहे अशी माहिती त्यांनी माध्यम प्रतिनिधीना दिली. वैजापूर येथे येण्यापूर्वी त्यांनी महालगाव, घायगाव व जांबरगाव शिवारात शेताच्या बांधावर जाऊन दुष्काळाच्या संकटात



सापडलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधला. अजून तालुक्याच्या डोंगरथडी भागातील काही गावांमध्ये पीक पाहणी करणार असल्याचे डॉ काळे यांनी सांगितले.

काँग्रेसचे तालूका अध्यक्ष राहुल संत, माजी नगरसेवक सुभाष गायकवाड, साहेबराव पडवळ, बाबासाहेब गायकवाड, प्रवीण खाजेकर, सफल त्रिभुवन आदिसह काँग्रेस कार्यकर्त्यांनी तहसीलदारांना निवेदन दिले. एनडीआरएफ अर्थात राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या निकषाची वाट न बघता शेतकऱ्यांना तातडीने मदत करावी, वेगवेगळे जी आर काढण्यापेक्षा तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करा, एनडीआरएफचे निकष बदला, पीक विम्याचे पैसे द्या या सोबतच आज पर्यंतची शंभर टक्के कर्ज माफी करावी या मागण्या करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण पाटील, जिल्हा प्रभारी संदीप बोरसे यांच्यासह जिल्हा काँग्रेस कमिटी तीन दिवसात संपूर्ण जिल्ह्यातील सर्व तालुक्यात जाऊन तेथील शिवार पाहणी करणार असून पीक परिस्थिती कशी आहे याबद्दल जाणून शासनाला निवेदन देत असल्याचे डॉ. काळे यांनी स्पष्ट केले.

**Change Name**

My name is recorded **"Sanjay Shyamrao Rathod"** However, as per my Aadhaar my correct and updated name is**"Sanjay Shamrao Rathod"**
Aadhaar Number :
**217618517506**

**छोटी जाहिरात**

श्रीरामपूर शहरालगत MIDC पासून जवळच धनगरवाडी शिवारात ११ गुंठे शेतजमीन विकणे आहे.
**संपर्क : रमेश सातव**
**८१०४९६२३८९**

# गटशेतीतून महिला शेतकऱ्यांचे सबलीकरण; विषमुक्त शेतीवर भर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** मानोरी येथे पाणी फाउंडेशन, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, कृषी विभाग आणि उमेद यांच्या संयुक्त विद्यमाने शेतीतील एसओपी जनजागृती कार्यक्रम झाला. सेंद्रिय व विषमुक्त शेती, गटशेती तसेच आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान माहिती केंद्राचे प्रा. डॉ. सुनील अडांगळे यांनी जीवामृत, बीजामृत, गांडूळखत व निंबोळी अर्क यांसारख्या सेंद्रिय निविष्ठांचा वापर वाढविण्याचे आवाहन केले. महिला बचत गट व शेतकरी गटांनी एकत्रित गटशेती केल्यास उत्पादन खर्च कमी होऊन नफा वाढण्यास मदत होईल, तसेच जमिनीचे आरोग्य सुधारेल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच ताराबाई वाघ होत्या. उपविभागीय कृषी अधिकारी प्रवीण गोसावी, सहाय्यक कृषी अधिकारी सारिका हरिश्चंद्रे, पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक विक्रम पाठक, उमेदचे तालुका अभियान व्यवस्थापक मिलिंद अडसुरे, कृषिभूषण डॉ. दत्तात्रय वने आदी उपस्थित होते.

रेणुका माता महिला शेतकरी गटातील १५ महिलांनी गटशेती व महिला सबलीकरणाच्या फायद्यांवर आधारित पथनाटिका सादर केली. विक्रम पाठक यांनी जलसंधारणासोबत गटशेती, महिला सबलीकरण, विषमुक्त शेती व सुरक्षित अन्ननिर्मितीवर भर देत असल्याचे सांगितले. डॉ. वने यांनी जलसाठ्यांचे योग्य व्यवस्थापन व एकत्रित गटशेतीची गरज व्यक्त केली. सारिका हरिश्चंद्रे यांनी महिला शेतकऱ्यांनी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन नोंदणी करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांची बैलगाडीतून ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. सविता पठारे यांनी स्वागतगीत सादर केले. विश्वनाथ सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले, तर राणी पगारे यांनी आभार मानले.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

मंगळवार दि. २९ सप्टेंबर २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | १२६ ४६९ ९०० | ५ | २३० २५८ ७८० | १ | १४६ ३४४ ४७० |

७९-९३-४५-५७-८१-१२

**कल्याण**
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | २४० २६८ ३३० | ८ | १२५ २६० ४४० | ४ | १४९ २३९ ५९० |

१६-६४-२८-८०-८०-५४-४७

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३४० ३९० २०० | ० | १९० २८० २४४ | ३ | १२० ३४६ ३३७ |

६२-२१-७०-०८-५३-३९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | | | Tue | | | Wed | | | Thu | | | Fri | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 | 89 | 135 | 990 | 80 | 127 | 260 | 82 | 570 | 128 | 11 | 290 | 590 | 48 | 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 | 56 | 123 | 556 | 67 | 188 | 458 | 76 | 466 | 240 | 69 | 379 | 689 | 33 | 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 | 15 | 249 | 348 | 50 | 136 | 158 | 42 | 390 | 257 | 41 | 245 | 126 | 90 | 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 | 21 | 245 | 118 | 04 | 158 | 689 | 33 | 779 | 168 | 55 | 249 | 579 | 19 | 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 | 95 | 249 | 127 | 04 | 789 | 257 | 47 | 269 | 157 | 34 | 266 | 255 | 22 | 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 | 84 | 356 | 120 | 36 | 790 | 237 | 21 | 470 | 150 | 60 | 136 | 277 | 69 | 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 | 41 | 155 | 680 | 47 | 368 | 128 | 18 | 350 | 379 | 90 | 136 | 150 | 63 | 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 | 96 | 114 | 277 | 64 | 770 | 259 | 60 | 145 | 189 | 81 | 579 | 179 | 78 | 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 | 60 | 550 | 590 | 42 | 228 | 358 | 62 | 390 | 400 | 47 | 890 | 160 | 70 | 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 | 90 | 569 | 170 | 85 | 159 | 338 | 42 | 129 | 460 | 09 | 478 | 370 | 05 | 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 | 99 | 234 | 230 | 53 | 148 | 250 | 70 | 235 | 355 | 39 | 135 | 133 | 76 | 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 | 60 | 460 | 278 | 73 | 346 | 116 | 82 | 480 | 156 | 23 | 779 | 449 | 77 | 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 | 96 | 790 | 255 | 23 | 229 | 789 | 42 | 237 | 450 | 98 | 440 | 266 | 41 | 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 | 43 | 670 | 170 | 81 | 560 | 159 | 52 | 336 | 690 | 50 | 235 | 577 | 99 | 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 | 47 | 557 | 228 | 27 | 124 | 570 | 26 | 358 | 112 | 43 | 779 | 445 | 33 | 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 | 47 | 124 | 336 | 20 | 136 | 799 | 56 | 178 | 680 | 42 | 345 | 399 | 16 | 790 |

## द•ख•ल



### श्रीराम प्रतिष्ठानच्या टाळ मृदंगाच्या गजरात गणरायाला निरोप

**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी येथील श्रीराम प्रतिष्ठान तरुण मंडळानेदहा दिवसापासून सुरू असलेल्या श्रद्धा आणि भक्तीच्या आनंद उत्सवाची शनिवारी दिनांक २६ सप्टेंबर रोजी मोठ्या भक्तीमय वातावरणात सांगता झाली यांना लाडक्या बाप्पाला निरोप देताना काढलेल्या विसर्जन निवडणुकीत आवाज उठवलेल्या डीजे बंजेला चांगले यश मिळावल्याचे पाहायला मिळाले श्रीराम प्रतिष्ठान या तरुण मंडळाने कर्कश आवाजाला फाटा देत पारंपारिक रूढीप्रमाणे टाळ मृदुंगज्ञानबा तुकाराम च्या गजरात सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. या मिरवणुकीत डीजे मुक्त सर्वांची मने जिंकले मिरवणूक उत्साहात भक्ती बाई आणि शांततामयवातावरणात पार पडली यावेळी चिचोंडी परिसरातील नागरिक ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते या भक्तीमय वातावरणामुळे चिचोंडीआनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

### समर्थ गुरुकुल व ज्युनिअर कॉलेजच्या खेळाडूंची खो-खो मध्ये दमदार कामगिरी



**निघोज :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अंतर्गत पुणे जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे यांच्या वतीने आयोजित जुन्नर तालुकास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेत समर्थ गुरुकुल व ज्युनिअर कॉलेज बेल्हे खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत पाच पदकांची कमाई केली. नुकत्याच पार पडलेल्या स्पर्धेत समर्थच्या खेळाडूंनी विविध वयोगटांत चमकदार कामगिरी केली. या स्पर्धेत १७ वर्षाखालील मुले मुली द्वितीय क्रमांक, १९ वर्षे खालील मुले मुली द्वितीय क्रमांक व १४ वर्षाखालील मुली तृतीय क्रमांक पटकावला. या यशामुळे समर्थ गुरुकुल व ज्युनिअर कॉलेजच्या एकूण पाच संघांनी पदकांची कमाई केली. स्पर्धेतील सामन्यांमध्ये समर्थच्या खेळाडूंनी जिद्द, आत्मविश्वास, शिस्त, चपळता आणि सांघिक समन्वय यांचे प्रभावी प्रदर्शन केले. प्रतिकूल परिस्थितीतही शेवटपर्यंत झुंज देत खेळाडूंनी आपल्या संघासाठी उत्कृष्ट कामगिरी केली. नियमित सराव आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे खेळाडूंना हे यश मिळाले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जि.प. सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, जुनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली आहेर, समर्थ गुरुकुल चे प्राचार्य सतीश कुऱ्हे प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांच्यासह संस्थेतील पदाधिकारी व शिक्षकांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

### भाविनिमगाव येथे वयोश्री योजने अंतर्गत शिबिर



**दहिगाव ने :** शेवगाव तालुक्यातील भावी निमगाव येथे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील तसेच आमदार मोनिका राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीचे युवा मोर्चाचे शेवगाव तालुका अध्यक्ष अनिल सुपेकर यांच्या संकल्पनेतून ज्येष्ठ नागरिक व महिला व दिव्यांग व्यक्तींसाठी आरोग्य तपासणी शिबीर राबविण्यात आले. गरजुंची ऑनलाइन नोंदणी करण्यात आली पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी पुढील प्रक्रिया राबवण्यात आली. डॉ. विखे पाटील फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली वयोश्री कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पात्र लाभार्थ्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन पूर्ण करण्यात आले. या कॅम्पला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. यावेळी डॉ. विखे पाटील मेडिकल कॉलेजच्या वैद्यकीय पथकातील डॉ. अभिजीत दिवटे, डॉ. दीपक अनाप, डॉ. अभिजीत मिरेकर, डॉ. सुजल भालेराव यांनी लाभार्थ्यांचे वैद्यकीय तपासणी केली. ३२५ पेक्षा जास्त लाभार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

### बाबुजी आव्हाड महाविद्यालयात जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धा उत्साहात



**पाथर्डी शहर :** अहिल्यानगर जिल्हा आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धा, अहिल्यानगर जिल्हा शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धा तसेच अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट वेटलिफ्टिंग असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित करण्यात आलेली युथ, ज्युनियर व सिनियर गटातील अहिल्यानगर जिल्हा वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा २०२६ बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त कुणाल आव्हाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभागाचे सचिव डॉ. सतीश चोरमले, महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक तथा अहिल्यानगर जिल्हा वेटलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव प्रा. डॉ. विजय देशमुख, उपाध्यक्ष राजेंद्र सोनवणे, प्रा. दादासाहेब लोखंडे आणि प्रा. डॉ. रोहित अदलिंग उपस्थित होते. या स्पर्धेतील विशेष उल्लेखनीय कामगिरी म्हणजे बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या महिला आणि पुरुष संघांनी आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. स्पर्धेचे पंच म्हणून राजेंद्र सोनवणे, प्रा. डॉ. विवेक साळवे, प्रवीण चोरमले, प्रशांत गायकवाड, शहानवाज आतार, कार्तिक तेवर, राहुल घुमरे आणि संजय लोखंडे यांनी जबाबदारी पार पाडली. स्पर्धेचे नियोजन आणि आयोजन सुरळीत पार पडण्यासाठी महाविद्यालयातील क्रीडा विभागाने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजय देशमुख यांनी केले, तर प्रा. सचिन शिरसाट यांनी उपस्थितांचे आभार मानले. खेळाडू, पंच, क्रीडा अधिकारी, शिक्षक आणि आयोजकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेला उत्साहपूर्ण वातावरण लाभले.

# मनपा कर्मचाऱ्यांच्या कर्जाच्या कपातीची रक्कम तातडीने द्या

## कर्जवसुलीची रक्कम न मिळाल्याने पतसंस्था आर्थिक अडचणीत; लॉक लावण्याची वेळ : चेअरमन मुदगल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून महानगरपालिका कर्मचाऱ्यांना अडचणीच्या काळात, तसेच वैद्यकीय उपचार आणि मुला-मुलींच्या शुभकार्यासाठी तातडीने कर्जरूपी आर्थिक मदत केली जाते. या कर्जाची मासिक हप्त्याची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या पगारातून थेट कपात करून पतसंस्थेच्या खात्यावर जमा केली जाते. मात्र, गेल्या चार महिन्यांपासून महानगरपालिका प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांच्या कर्ज हप्त्यापोटी कपात करण्यात आलेली रक्कम पतसंस्थेला मिळालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पतसंस्था आर्थिक अडचणीत सापडली असून, महापालिकेकडे आतापर्यंत तब्बल ४ कोटी ३१ लाख ९१ हजार ३२० रुपये थकबाकी असल्याचे पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

महापालिका कर्मचाऱ्यांनी पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या हप्त्यांची रक्कम दरमहा त्यांच्या वेतनातून कपात केली जाते. ही कपात केलेली रक्कम पतसंस्थेच्या खात्यावर नियमितपणे जमा होणे अपेक्षित असताना गेल्या अनेक महिन्यांपासून ती वेळेवर मिळत नसल्याने संस्थेच्या आर्थिक व्यवहारांवर मोठा परिणाम झाला आहे. याबाबत पतसंस्थेने महापालिका प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करून तसेच सातत्याने पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचे संचालक मंडळाचे म्हणणे आहे.

पतसंस्थेला जिल्हा बँकेकडून सुमारे ३ कोटी रुपयांचे कॅश क्रेडिट कर्ज उपलब्ध होत असते. मात्र, सदर कॅश क्रेडिटची मर्यादाही संपल्याने पतसंस्थेसमोर आर्थिक अडचणी अधिक गंभीर झाल्या आहेत. सभासदांच्या कर्जाच्या हप्त्यांची कपात महापालिकेच्या माध्यमातून होत असतानाही ही रक्कम संस्थेला मिळत नसल्यामुळे कर्जवाटप व दैनंदिन आर्थिक व्यवहारांवर परिणाम होत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. कपात केलेल्या कर्ज हप्त्यांची रक्कम तातडीने पतसंस्थेच्या खात्यावर जमा करावी, या मागणीसाठी पतसंस्थेच्या संचालक मंडळासह सभासदांनी महापालिका प्रशासकीय कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. वारंवार पत्रव्यवहार व पाठपुरावा करूनही प्रश्न सुटला नसल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या धरणे आंदोलनावेळी चेअरमन बाबासाहेब मुदगल, व्हॉइस चेअरमन कैलास चावरे, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, संचालक सतीश ताठे, अजय कांबळे, विजय कोतकर, किशोर कानडे, बाळासाहेब गंगेकर, विकास गीते, बलराज गायकवाड, सोमनाथ सोनवणे, गुलाब गाडे, बाळासाहेब पवार, प्रमिलाताई पवार, शेखर देशपांडे, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी, तसेच संतोष गवळी, राजू तडवी, बाला तिवारी, बालाजी गंगेकर, सोनू चौधरी आदी सभासद उपस्थित होते.

## निघोज परिसरात विकासकामांसाठी १५ कोटी रुपयांचा निधी : आ. दाते

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**निघोज :** निघोज आणी परिसरातील वाडी वस्तीवर रस्ते तसेच जनतेच्या सोयीसुविधांसाठी आमदार काशिनाथ दाते सर यांनी १५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून लवकरच ही कामे मार्गी लागणार असून निघोज गावचे शिष्टमंडळ माजी सरपंच चंद्रकांत लामखडे यांच्या नेतृत्वाखाली आमदार दाते सर यांना सोमवार दि.२८ रोजी भेटले तसेच ही विकासकामे मंजूर केल्याबद्दल आनंद व्यक्त केला तसेच गाव व पंचक्रोशीतील जनतेच्या वतीने आमदार दाते सर यांचा सत्कार केला. याबद्दल बोलताना आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले की राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करताना गेली दोन वर्षात मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केली आहेत. कोण माझा हे करण्यापेक्षा आपल्याला तालुक्यातील जनतेने आमदार म्हणून निवडून दिले आहे. विकासकामे सर्वत्र झाली पाहिजे ही आपली संकल्पना आहे.

निघोज गाव व परिसर मोठा आहे. विकासकामे करण्याचीही आपल्याला संधी आहे याकरीता जनतेच्या सोयीसुविधा पुर्ण करण्यासाठी निघोज गाव व परिसरातील वाडी वस्ती साठी भरीव अशी १५ कोटी रुपयांची विकासकामे आपण मंजूर केली असून लवकरच या कामांचे भूमिपूजन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या शुभहस्ते होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी चंद्रकांत लामखडे, ॲड. बाळासाहेब लामखडे, सुधामती कवाद, प्रभाकर लाळगे, सोमनाथ वरखडे, रोहिदास लामखडे, विठ्ठलराव कवाद, शिवाजीराव डेरे, हिरामण सोनवणे, वसंत ढवण, रामदास रसाळ, पोपटराव रसाळ, योगेश वाव्हळ, दत्तात्रय कुदळे , सुखदेव वाव्हळ, रंगनाथ रसाळ, योगेश साबळे, हरिभाऊ साबळे, खंडू भांबरे, भाऊ साबळे, भाऊ रसाळ, शहाजी लामखडे, दत्तात्रय रसाळ, संतोष शिंदे, बाबाजी लाळगे, भरत रसाळ, ग्रामपंचायत सदस्या ज्योती पांढरकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## पारनेर शहरात बैलपोळा उत्साहात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर :** पारनेर नगरपंचायतीचे नगरसेवक पै. युवराज पठारे यांच्या वतीने पारनेर शहरात भव्य बैलपोळा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पारंपरिक बैलपोळा सणाचे महत्त्व जपत धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसह बैलजोडीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

बैलपोळा महोत्सवाच्या निमित्ताने पारनेर शहरातून निघालेल्या मिरवणुकीत युवकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. यावेळी नगरसेवक पै. युवराज पठारे यांच्या नावाने 'भावी नगराध्यक्ष' अशा घोषणा देण्यात आल्या. आगामी काळात पारनेर नगरपंचायतीची निवडणूक होणार असल्याने या घोषणांनी राजकीय चर्चेला उधाण आले. युवकांचा वाढता सहभाग आणि नागरिकांचा उत्साह लक्षवेधी ठरला.

रविवार रोजी सायंकाळी ४ ते ७ या वेळेत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात विविध बैलगाडा शर्यती व प्रदर्शनांमध्ये तब्बल ३६ वेळा प्रथम क्रमांक पटकावलेल्या, २२ महिन्यांच्या व दोन दाती असलेल्या बैलजोडीचे विशेष आकर्षण मिरवणुकीत होते. या बैलजोडीची किंमत तब्बल ६ लाख ५१ हजार रुपये असल्याने नागरिकांमध्ये या जोडीबाबत विशेष उत्सुकता होती.

पारंपरिक पद्धतीने बैलांची पूजा करून त्यांना सजविण्यात आले. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात व उत्साहपूर्ण वातावरणात बैलजोडीची पारनेर शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीदरम्यान नागरिकांनी बैलजोडीचे कौतुक केले. पारंपरिक शेती संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या बैलपोळा सणाचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, तसेच ग्रामीण संस्कृती आणि परंपरांचे जतन व्हावे, या उद्देशाने पै. युवराज पठारे यांनी या महोत्सवाचे आयोजन केले.

या कार्यक्रमाला आ. काशिनाथ दाते, कुंडलिक पठारे, युवा नेते मंगेश दाते, डॉ. श्रीकांत पठारे, वसंत चेडे, नितीन अडसूळ, अरुणराव ठाणगे, बाळासाहेब पठारे, दत्तानाना पवार, मनोज मुंगसे, अर्जुन भालेकर, योगेश मते, विकास रोकडे, सुभाष सासवडे, सतीश पिंपरकर, दत्ता दिवटे, निवृत्ती वरखडे, किरण कोकाटे, ऋषिकेश गंधाडे, यशवंत पठारे, प्रवीण पठारे, प्रदीप नगरे, प्रसाद कर्णावट आदी उपस्थित होते. सूत्रसंचालक लहू साबळे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## नवमतदार नोंदणीला सर्व्हरचा खोडा! बीएलओंसह नवमतदारांची दमछाक

### 'शिकवायचे की निवडणूक आयोगाचे काम करायचे?'

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**श्रीगोंदा :** नवमतदारांची ऑनलाइन नोंदणी करण्याच्या प्रक्रियेला निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरील तांत्रिक अडचणींचा फटका बसत आहे. वारंवार सर्व्हर डाऊन होत असल्याने नवमतदारांची नोंदणी रखडत असून, मतदार नोंदणीचे काम करणाऱ्या बीएलओ शिक्षकांचीही मोठी दमछाक होत आहे. संकेतस्थळ सुरळीत होत नसल्याने 'काम करायचे तरी कसे?' असा प्रश्न बीएलओंकडून उपस्थित केला जात आहे.

देशाचे भविष्य घडविणाऱ्या शिक्षकांवर अध्यापनाबरोबरच विविध प्रशासकीय कामांची जबाबदारी सोपविली जाते. त्यात आता मतदार नोंदणीच्या कामाची भर पडली असून, संकेतस्थळच सुरळीत चालत नसल्याने शिक्षकांना प्रत्यक्ष काम करण्यापेक्षा तांत्रिक अडचणींशी झगडण्यातच वेळ खर्च करावा लागत आहे. 'शिकवायचे की निवडणूक आयोगाचे काम करायचे?' असा सवाल शिक्षकांमधून उपस्थित होत आहे.नवमतदारांकडून नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे व माहिती उपलब्ध करून दिल्यानंतरही ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने त्यांनाही हेलपाटे मारावे लागत आहेत. अनेक ठिकाणी शिक्षकांनी या प्रकाराबाबत नाराजी व्यक्त करत नकारात्मक भूमिका घेतल्याने प्रशासनासमोरील अडचणी वाढल्या आहेत.निवडणूक आयोगाने या गंभीर तांत्रिक समस्येची तातडीने दखल घेऊन संकेतस्थळाचा सर्व्हर सुरळीत करावा, नोंदणी प्रक्रिया वेगवान करावी आणि बीएलओंना काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी होत आहे. अन्यथा सर्व्हरच साथ देत नसेल तर बीएलओंनी काम करायचे तरी कसे? असा सवाल उपस्थित होत आहे.

## बेलवंडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची ९० वी वार्षिक सभा उत्साहात



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बेलवंडी बु. :** बेलवंडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची ९० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २७ रोजी भैरवनाथ सोसायटीसमोर चेअरमन विजय काळाने यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. या सभेत संस्थेच्या मागील वर्षातील कामकाजाचा आढावा, आर्थिक व्यवहार आणि सभासदांच्या हिताच्या विविध बाबींवर सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार यांनी सांगितले की, कर्जमाफीचा विषय मार्गी लागल्यानंतर सोसायटी आता नवी उभारी घेणार असून लवकरच चांगल्या नफ्यात येईल. पाऊस पडेना, त्यामुळे दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असल्याने सर्वांनी आता पाण्याचा वापर काटकसरीने करावा त्याचबरोबर कुकडी घोड आणि विसापूरच्या पाण्यासाठी आता संघर्ष करण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे असे आवाहन केले. यावेळी ज्ञानदेव हिरवे, सुभाष काळाने, सरपंच ऋषिकेश शेलार, संग्राम पवार, दिनेश इथापे, त्रिंबक मुठाळ, सुनील ढवळे, संतोष काळाने यांनी आपली मनोगत व्यक्त करत सूचना केल्या. यावेळी संचालक मंडळ, सभासद व कर्मचारी उपस्थित होते.

# एसआयआरच्या माध्यमातून मतचोरीचा आरोप

## मुख्य निवडणूक आयुक्तांना बडतर्फ करून अटक करण्याची काँग्रेसची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

### अहिल्यानगर शहर जिल्हा काँग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**अहिल्यानगर :** निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण एसआयआर प्रक्रियेच्या माध्यमातून मतदारांची नावे वगळून मतचोरी केली जात असल्याचा आरोप करत अहिल्यानगर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाई करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावे तसेच अटक करावी, अशी मागणी करून निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. निवडणूक प्रक्रिया स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक असणे आवश्यक असून, निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये संशय निर्माण होऊ नये, अशी भूमिका काँग्रेसने निवेदनातून मांडली.

निवेदनात म्हटले आहे की, निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाची प्रक्रिया सुरू असून, या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात मतदारांची नावे वगळली जात असल्याचा काँग्रेसचा आरोप आहे. तसेच मतदार यादीतील फेरफाराबाबत विविध माध्यमांमध्ये वृत्त प्रसिद्ध झाल्याचा दाखलाही निवेदनात देण्यात आला आहे.

काँग्रेसने पश्चिम बंगालसह काही राज्यांमधील मतदार यादीतील नावांबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांचा उल्लेख करत, मतदारांच्या नावांची वगळणी आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत स्पष्टीकरण देण्याची मागणी केली आहे.



निवडणूक प्रक्रिया आणि संविधानिक मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण समवेत फिरोज खान, मयूर पाटोळे, सुनील शेत्रे, माजी नगरसेवक फैयाज शेख, यश चव्हाण, अभिषेक शिंदे, समर्थ व्यवहारे, अभिजीत कांबळे, श्यामराव वागस्कर, स्वप्निल शिंदे, डॉ. बापू चंदनशिवे, रियाज शेख, विवेक कसबे, राजेंद्र कर्डिले, रवी सातपुते, अकील सय्यद यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दखल

### दुष्काळात शेतकरी उत्पादक कंपन्यांना मदत द्या

**पुणे :** राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी उत्पादक कंपन्यांना विशेष मदत व सवलती द्याव्यात, तसेच कर्ज पुनर्गठनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी महाफार्मर्स प्रोड्यूसर कंपनीच्या बाराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात आली.

मार्केट यार्ड येथे झालेल्या सभेला राज्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, संचालक व पदाधिकारी उपस्थित होते. स्मार्ट, मॅग्नेटसह विविध योजनांतून शेतकरी उत्पादक कंपन्यांनी गोदामे, शीतगृहे आणि अन्य पायाभूत सुविधा उभारण्यासाठी मोठी गुंतवणूक केली आहे. मात्र, दुष्काळामुळे शेतमालाचे उत्पादन, उपलब्धता, संकलन आणि बाजारातील व्यवहारावर परिणाम झाला आहे. त्यामुळे या सुविधांचा अपेक्षित वापर होऊन उत्पन्न मिळविण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांना सहभागी करून त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत मदत व सुविधा पोहोचविण्याची यंत्रणा उभारावी, अशी मागणीही करण्यात आली. याबाबत मुख्यमंत्री आणि कृषिमंत्र्यांना निवेदन देण्याचा निर्णय घेण्यात आला. महाएफपीसीचे संचालक योगेश थोरात यांनी याबाबत माहिती दिली.

### चाकण-हिंजवडीसाठी १,८२६ कोटींचा आराखडा

**पुणे :** चाकणमधील वाहतूक, रस्ते, पावसाळी पाणी निचरा आणि नागरी सुविधांच्या विकासासाठी १ हजार ४०० कोटी रुपयांच्या, तर हिंजवडीतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी ४२६.५४ कोटी रुपयांच्या एकात्मिक आराखड्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्त्वतः मंजुरी दिली. सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आराखड्याचे सादरीकरण केले.

चाकणमधील कामे डिसेंबरपासून सुरू करून पुढील पावसाळ्यापूर्वी वाहतूक आणि पाणी निचऱ्याच्या समस्येत सुधारणा करण्याचे नियोजन आहे. एमआयडीसी, पीएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद आणि अन्य यंत्रणांच्या समन्वयातून ही कामे केली जाणार आहेत.चाकण औद्योगिक परिसरातील सुमारे ७८ किलोमीटर लांबीच्या नैसर्गिक नाल्यांवर अतिक्रमणे झाल्याने पावसाळ्यात पाणी साचते. नाले मोकळे करणे, रस्त्यालगत पावसाळी गटारे, कल्व्हर्ट व पुलांची क्षमता वाढविणे आणि आवश्यक ठिकाणी पाणी साठवण व्यवस्था उभारण्यात येणार आहे. अतिक्रमण हटविण्याची ७० ते ८० टक्के कार्यवाही पूर्ण झाली असून जून २०२७ पर्यंत नाले मोकळे करण्याचे उद्दिष्ट आहे. सुमारे ३८ किलोमीटर लांबीची पावसाळी गटार व्यवस्थाही उभारली जाणार आहे.चाकण औद्योगिक परिसरातील ४९८ किलोमीटर रस्त्यांचा अभ्यास करून पहिल्या टप्प्यात ७५ किलोमीटर रस्त्यांची सुधारणा करण्यात येणार आहे. पादचारी मार्ग, सुरक्षित रस्ता ओलांडण्याची व्यवस्था आणि वाहतूक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

### अण्णासाहेब पाटील यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम

**पुणे :** स्वर्गीय आमदार अण्णासाहेब पाटील यांची ९३ वी जयंती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे येथे उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अण्णासाहेब पाटील यांच्या सामाजिक कार्याचे तसेच माथाडी कामगार चळवळीतील योगदानाचे स्मरण करण्यात आले. आर्थिक मागास विकास महामंडळाच्या विविध योजना, कर्ज सुविधा व व्याज परतावा याबाबत लाभार्थींना माहिती देण्यात आली. युवकांनी स्वयंरोजगार व उद्योजकतेकडे वळून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, तसेच अण्णासाहेब पाटील यांचा विचार व वारसा पुढे न्यावा, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमास कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे अधिकारी, महामंडळाचे समन्वयक तसेच लाभार्थी उपस्थित होते.

# भीमाशंकर मार्फत सभासद ऊस उत्पादकांना गावोगावी साखर वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यामार्फत महाराष्ट्र राज्याचे माजी सहकारमंत्री मा.ना.श्री. दिलीपराव वळसे पाटील यांचे मार्गदर्शनानुसार सभासद व ऊस उत्पादकांना प्रतिवर्षाप्रमाणे दिपावली निमित्त गाव व गटवार साखर वाटपाचे नियोजन केले आहे. त्यानुसार शुक्रवार दि. २ ऑक्टोबर ते शनिवार दि. १० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत रु. २०/- प्रति किलो दराने गावोगावी साखर वाटप करण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी दिली.

कारखान्यामार्फत मागील वर्षी सभासदांसाठी स्मार्ट साखर कार्ड विभागीय शेतकी कार्यालयामध्ये वाटप करणेत आलेली आहेत. तसेच हंगाम २०२५-२६ मध्ये ऊस पुरवठा केलेल्या ऊस उत्पादकांसाठी साखर कार्ड वाटपाचे काम संबंधित विभागीय शेतकी गट ऑफिसला चालू आहे. नियोजीत साखर वाटप तारखेला साखर घेताना सभासद व ऊस उत्पादकांनी त्यांना दिलेले स्मार्ट कार्ड व ओळखीचा पुरावा सोबत आणणे आवश्यक आहे.

साखरेचे वाटप कारखान्याचे भागधारक व गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये ऊस पुरविलेला आहे यांचेसाठी साखर वाटप राहील. त्यामध्ये (१) पूर्ण शेअर्स (रक्कम रु. १५,०००/-) व ऊस पुरवठा केलेले - ८० किलो (२) फक्त पूर्ण शेअर्स (रक्कम रु. १५,०००/-) - ५० किलो (३) अपूर्ण शेअर्स रक्कम व ऊस पुरवठा केलेले - ४० किलो (४) फक्त ऊस पुरवठा केलेले - ४० किलो (५) फक्त अपूर्ण शेअर्स रक्कम जमा केलेले - ३० किलो याप्रमाणे खालील तारखेनुसार विभागीय शेतकी गटांतर्गत गावोगावी १०, २० व ५० किलो पॅकींगमध्ये साखर वाटपाचे नियोजन केलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. २ - | पारगाव गटातील सर्व गावे, |
| शनिवार | दि. ३ - | पारगाव गाव, निरगुडसर व जांबूत गटातील सर्व गावे, |
| रविवार | दि. ४ - | निरगुडसर गाव, कळंब व रांजणी गटातील सर्व गावे, |
| सोमवार | दि. ५ - | मंचर गटातील सर्व गावे, |
| मंगळवार | दि. ६ - | मंचर व अवसरी खुर्द गाव व घोडेगाव गटातील सर्व गावे, |
| बुधवार | दि. ७ - | टाकळी हाजी, कवठे व करंदी गटातील सर्व गावे, |
| गुरुवार | दि. ८ - | करंदी गटातील गावांसाठी गट ऑफिस, |
| शुक्रवार | दि. ९ - | जातेगाव, भोरवाडी, निमगाव सावा, नारायणगाव गट, ओझर, उंब्रज या गटातील गावांसाठी गट ऑफिस येथे, खोडद व पारगाव (मंगरूळ) गाव येथे, |
| शनिवार | दि. १० - | जातेगाव बु, भोरवाडी, निमगाव सावा, नारायणगाव अंतर्गत सबंधित साखर वाटप गावांसाठी गट ऑफिस येथे व खेड गटातील गावांसाठी मार्केट यार्ड खेड येथे, |

जे सभासद / ऊस उत्पादक वरील नियोजीत कालावधीत आपआपले गावामधून साखर घेवू शकणार नाहीत त्यांना साखर रविवार दि. ११ ऑक्टोबर ते बुधवार दि. १४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीमध्ये कारखाना साईटवर सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत वाटप केली जाणार आहे. त्याशिवाय राहिलेल्या सभासद व ऊस उत्पादकांना सप्टेंबर २०२७ पर्यंत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी कारखाना साईटवर सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत साखर वाटप करण्यात येणार आहे. तरी वरील नमूद तारखेला सभासद व ऊस उत्पादकांनी साखर घेवून जाणेचे सहकार्य करावे असे आवाहन कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रदीप वळसे पाटील यांनी केले.

# शिरूर बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरूर :** कृषि उत्पन्न बाजार समितीची महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ च्या कलम २७ (अ) अन्वये सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा बाजार समितीच्या छत्रपती शिवाजी महाराज मुख्यबाजार आवार शिरूर येथील सभागृहात सोमवार दि.२८ सप्टेबर २०२६ रोजी प्रशासक तथा सहाय्यक निबंधक श्री. हरिश्चंद्र सुरेश कांबळे यांचे अध्यक्षतेखाली भरली.

श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास हार घालून व दिवंगत उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांच्या फोटोस पुष्पहार अर्पन करून सभेस रितसर सुरूवात झाली.

सदर सभेमध्ये बाजार समितीची आर्थिक परिस्थिती,उत्पन्न, खर्च, वाढावा इत्यादी बाबींबाबत माहीती सचिव अनिल ढोकले यांनी दिली.

बाजार समितीने उत्पन्न वाढीबाबत जे वेगवेगळे उपक्रम व पायाभूत सुविधा राबविलेल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने शिरूर येथे धान्य बाजार, शेळी मेंढी बाजार, भाजीपाला तरकारी थेट शेतकरी ते खरेदीदार यांचा शेतकरी बाजार, नविन मार्केट यार्ड शिरूर येथील कांदा मार्केट, कॉम्प्युटराईज्ड वजनकाटा, उपबाजार तळेगांव ढमढेरे येथील धान्य मार्केट, शेळी मेंढी बाजार, कॉम्प्युटराईज्ड़ वजनकाटा, उपबाजार पिंपळे जगताप व पाबळ यार्डवरील भाजीपाला-तरकारी मार्केट, उपबाजार वडगांव रासाई येथील नियंत्रीत गुळ व्यापार इत्यादींसाठी ज्या पायाभुत सुविधा उभारलेल्या आहेत. त्यामधुन शेतकऱ्यांना त्यांचे शेतमालाची विक्री खर्चात कशी बचत झालेली आहे याबाबतही प्रास्तविक करताना माहीती प्रशासक हरिश्चंद्र कांबळे यांनी दिली. बाजार समितीस चालु आर्थिक वर्षात विक्रमी रू.४.८९ कोटीचे उत्पन्न झालेले असुन गेल्या वर्षीचे तुलनेत ते सुमारे ८६ लाखाने अधिकचे झालेले आहे. प्रशासनाने चांगले प्रकारे केलेल्या कामाची ती पोहोच पावतीच आहे. त्याबद्दल बाजार समिती प्रशासनाचे उपस्थित सर्वांनी अभिनंदन केले.

सर्वसाधारण सभेस तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सोसायटी व ग्रामपंचायतचे खालील प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामध्ये हमाल पंचायतीचे बंडु जाधव, व्यापारी प्रतिनिधी नारायण भोसले, पिंपळसुटीचे फत्तेसिंग वाबळे, गोलेगांवचे संतोष वर्पे व संतोष वाखारे, भांबर्डेचे हनुमंत पवार, खैरैनगरचे तात्याभाऊ खैरे, निमगांव भोगीच्या उर्मीला फलके, लंघेवाडीचे गणेश चव्हाण,रांजणगांव गणपतीचे सतिष शेळके, कर्डेचे प्रल्हाद वाळके, धानोरेचे सुभाष माशेरे व तालुक्यातील अनेक सोसायट्यांचे चेअरमन, ग्रामपंचायत सरपंच तसेच आडतदार, हमाल मापाडी प्रतिनिधी उपस्थित होते. बाजार समितीने जे वेगवेगळे उपक्रम राबविले व शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून बाजार समितीमध्ये आमुलाग्र बदल केला त्याबद्दल सर्व उपस्थित प्रतिनिधींनी मागील संचालक मंडळ, प्रशासक व कर्मचारी यांचे अभिनंदन केले व उत्तरोत्तर बाजार समितीची अशीच प्रगती होत राहो अश्या शुभेच्छा दिल्या.तालुक्यातील ग्रामपंचायत, विविध कार्यकारी सेवा सोसायटी, आडतदार-खरेदीदार, हमाल-मापाडी यांचे प्रतिनिधी सभेस उपस्थित राहील्याबद्दल सचिव अनिल ढोकले यांनी आभार मानले.

# संरक्षित शेती अनुदानासाठी शेतकऱ्यांचा मोर्चा

## अनुदान ५० टक्के करण्यासह जाचक अटी रद्द करण्याची मागणी




पुण्यातील राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या कार्यालयावर मोर्चा काढून संरक्षित शेतीचे अनुदान ५० टक्के करण्यासह विविध मागण्यांचे निवेदन देताना शेतकरी व संघटनांचे पदाधिकारी.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाने संरक्षित शेतीसाठीचे अनुदान ५० टक्क्यांवरून ३५ टक्के केल्याचा निषेध करत हे अनुदान पुन्हा ५० टक्के करावे, तसेच २१ ऑगस्ट २०२६ चे सुधारित मार्गदर्शक परिपत्रक रद्द करावे, या मागणीसाठी ४०० हून अधिक शेतकऱ्यांनी सोमवारी राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या पुणे विभागीय कार्यालयावर मोर्चा काढला. शेतकरी प्रतिनिधींनी उपसंचालकांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले.

संरक्षित शेती प्रकल्पांसाठीच्या अनुदानात १५ टक्के कपात करण्यात आली आहे. त्यातच पॉलीहाऊस आणि शेडनेट उभारणीसाठी लागणाऱ्या साहित्यावर १८ टक्के वस्तू व सेवा कर आकारला जात असल्याने प्रकल्पाचा खर्च वाढला आहे. अनुदानासाठी लागू करण्यात आलेल्या विविध जाचक अटींमुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्याचे आंदोलकांनी सांगितले.दिल्ली येथे १५ आणि १६ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ तसेच कृषी भवनासमोर आंदोलन करूनही अपेक्षित दखल घेण्यात आली नसल्याने देशातील दहा राज्यांत आंदोलन सुरू करण्यात आले आहे. त्याचाच भाग म्हणून पुण्यात मोर्चा काढण्यात आला.

मोर्चात मावळ तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी मुकुंद ठाकर, आयजीएमएचे राष्ट्रीय सचिव परमेश्वर तोर, राष्ट्रीय सहसचिव तथा महाराष्ट्र अध्यक्ष तेजोमय घाडगे, वैभव खांडरे, नितीन जगताप, रोशन पिंगळे, जयदिप ननवरे, पवना संस्कृती एफपीसी, महाराष्ट्र फुल उत्पादक संघ, पुणे फुल उत्पादक कंपनीचे शेतकरी आणि इंडियन ग्रीनहाऊस मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनचे पदाधिकारी सहभागी झाले होते.दरम्यान, शेतकरी प्रतिनिधींनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली आहे.

पुढील महिन्यात बारामती येथे कृषी विज्ञान केंद्राच्या दौऱ्यावर येणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे हा विषय मांडण्याचे आश्वासन पवार यांनी दिल्याचे प्रतिनिधींनी सांगितले. मुख्यमंत्री आणि कृषिमंत्र्यांनी केंद्रीय कृषी मंत्रालयाकडे पाठपुरावा करून प्रश्न सोडवावा, अशी मागणीही करण्यात आली.

**प्रमुख मागण्या**

- **२१ ऑगस्ट २०२६ चे सुधारित मार्गदर्शक परिपत्रक रद्द करावे.**
- **संरक्षित शेतीचे अनुदान पूर्ववत ५० टक्के करावे.**
- **पॉलीहाऊस व शेडनेट साहित्यावरील १८ टक्के**
- **जीएसटी कमी करून ५ टक्के करावा.**
- **जुन्या नियमांनुसार अर्ज केलेल्या आणि जीओसी**
- **परवानगी मिळालेल्या प्रकल्पांना जुन्या नियमांनुसार लाभ द्यावा.**
- **'एक कुटुंब-एक लाभार्थी' अटीचा पुनर्विचार करून स्वतंत्र भावांच्या स्वतंत्र प्रकल्पांना लाभ द्यावा.**
- **दहा हजार रुपयांपेक्षा अधिक पेन्शन घेणारे सेवानिवृत्त जवान व सरकारी कर्मचारी यांना योजनेतून वगळण्याची अट रद्द करावी.**

संरक्षित शेतीत शेतकरी स्वतःचे भांडवल, जमीन आणि बँकेचे मोठे कर्ज गुंतवतात. अचानक बदललेल्या धोरणामुळे शेतकरी आणि फुल उत्पादक अडचणीत आले आहेत. याचा परिणाम निर्यातीवरही होऊ शकतो. प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करून शेतकरी हिताचे निर्णय घ्यावेत.

-मुकुंद ठाकर, प्रगतिशील शेतकरी

अनुदानात १५ टक्के कपात आणि साहित्यावर १८ टक्के जीएसटीमुळे शेतकऱ्यांच्या हातात मिळणारी रक्कम कमी राहते. त्यामुळे शेडनेट व हरितगृह उभारणीचा व्यवसाय अडचणीत आला आहे. सरकारने ५० टक्के अनुदान पूर्ववत करावे.

-तेजोमय घाडगे, राष्ट्रीय सहसचिव, आयजीएमए

# बोरा महाविद्यालयाचा गावनिहाय सर्वेक्षण उपक्रम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरूर :** शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाच्या चांदमल ताराचंद बोरा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या भूगोल विभागाने शिरूर तालुक्यातील सर्व गावांचे मृदा व जल परीक्षणासह आरोग्य, ऊर्जा, आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण करण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाचा प्रारंभ निमगाव भोगी येथून करण्यात आला.

या प्रकल्पांतर्गत गावांमधील मातीची गुणवत्ता, सुपीकता, जलस्रोतांची गुणवत्ता, उपलब्धता व वापर यांची शास्त्रीय माहिती संकलित केली जाणार आहे. मृदा परीक्षणाच्या आधारे पिकांची योग्य निवड, संतुलित खत व्यवस्थापन आणि मृदा संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती उपलब्ध होणार आहे.

तसेच गावातील आरोग्य, ऊर्जा, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचे क्षेत्रीय सर्वेक्षण केले जाणार आहे. नागरिकांना विविध शासकीय कल्याणकारी योजनांची, तर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शैक्षणिक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. संकलित माहितीच्या आधारे शेती, जलव्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन व ग्रामविकासासाठी नियोजनास मदत होणार आहे.

प्रकल्पाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते यांनी मार्गदर्शन केले. मृदा व जल परीक्षणाचे कृषी, पर्यावरण आणि ग्रामविकासातील महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. अशा क्षेत्राधारित उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतो आणि महाविद्यालयातील ज्ञानाचा ग्रामीण विकासासाठी उपयोग करता येतो, असे त्यांनी सांगितले.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एच. एस. जाधव यांचे प्रकल्पास मार्गदर्शन लाभले. भूगोल विभागप्रमुख डॉ. अतुल जेठे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी भूगोल विभागातील डॉ. एन. एस. पाडळकर, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आप्पासाहेब चव्हाण आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. आयोध्या क्षीरसागर उपस्थित होते.




निमगाव भोगी येथे बोरा महाविद्यालयाच्या गावनिहाय सर्वेक्षण उपक्रमाच्या प्रारंभी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते.

# मतदार याद्यांतील गोंधळाची चौकशी करा; ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घ्या

**युवक काँग्रेसचे शिवराज मोरे यांची मागणी; निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसह बेरोजगारी आणि सरकारी रिक्त पदांचा प्रश्नही उपस्थित**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** मतदार याद्यांतील कथित अनियमितता आणि निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेबाबत समोर आलेल्या बाबी गंभीर असून, या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांनी सोमवारी पुण्यात केली.महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, प्रदेश उपाध्यक्ष प्रथमेश आबनावे, माध्यम प्रमुख अक्षय जैन, पुणे शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष सौरभ अमराळे, पुणे ग्रामीण युवक काँग्रेसचे अध्यक्ष उमेश पवार, पिंपरी-चिंचवड युवक काँग्रेसचे अध्यक्ष कौस्तुभ नवले, प्रदेश सरचिटणीस गणेश उबाळे, उमेश कंधारे, विश्वजीत जाधव, दिलीपसिंह देशमुख, प्रदेश सचिव प्रियंका चौधरी, पंकज पोळ, आनंद दासा आदी उपस्थित होते. पत्रकार परिषदेत युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी पांढरे मास्क परिधान करून आणि हातांना निळा रंग लावून प्रतीकात्मक निषेध नोंदविला.शिवराज मोरे म्हणाले, "लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे आणि त्याचा मतदानाचा अधिकार अबाधित राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मतदारांची नावे समाविष्ट करणे किंवा वगळणे यासारख्या मूलभूत प्रक्रियेबाबत निवडणूक आयोगातीलच दोन आयुक्तांनी वारंवार आक्षेप नोंदविल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यामुळे या प्रश्नांकडे केवळ राजकीय आरोप म्हणून न पाहता पारदर्शक चौकशी होणे आवश्यक आहे."

द इंडियन एक्स्प्रेसच्या तपासणीनुसार निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी मागील दहा महिन्यांत मतदार नोंदणी, नावे वगळणे, फॉर्म-६ मधील बदल तसेच मतदारयादीच्या डेटाबेससंदर्भातील विविध निर्णयांवर किमान १४ वेळा लेखी आक्षेप नोंदविले आहेत. या वृत्तानंतर निवडणूक आयोगाच्या अंतर्गत निर्णयप्रक्रियेबाबतही राजकीय प्रश्न उपस्थित झाले आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या घडामोडींनंतर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

# विधानपरिषद शिक्षक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांना विशेष अधिकार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** विधानपरिषद शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ शांततेत, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील निवडणूक होणाऱ्या भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३६ अन्वये पोलिसांना विशेष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

पिंपरी-चिंचवडचे पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांनी याबाबतचा आदेश जारी केला आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानपरिषद शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ चा कार्यक्रम जाहीर झाला असून, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान आणि २७ ऑक्टोबर २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रियेच्या कालावधीत आदर्श आचारसंहिता लागू राहणार आहे.निवडणूक प्रक्रिया सुरळीत व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी निवडणूक होणाऱ्या कार्यक्षेत्रातील सर्व पोलिस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना लेखी अगर तोंडी आदेश देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. याबाबत मार्ग निश्चित करणे, सार्वजनिक ठिकाणी कार्यक्रमाच्या वेळी वापरण्यात येणाऱ्या ध्वनिक्षेपकाच्या ध्वनीची तीव्रता निश्चित करून त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच मिरवणुकीच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ याबाबत नियंत्रण ठेवणे, या बाबींचा समावेश आहे.

# डीजेच्या बेसवर मात करणारा 'छन छन' आवाज

## मुंजेवाडीत ग्रामस्थांनी पेटवली लेजिमची नवी मशाल...!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**घारगाव :** गावात लग्न असो, मिरवणूक असो की एखादा मोठा सण... एकेकाळी समोर असायची लेजिमची तुकडी, हातातील लेजिमचा तो शिस्तबद्ध तालावर येणारा 'छन छन' आवाज आणि ढोल-ताशांचा कडकडाट मात्र, काळाच्या ओघात ही पारंपरिक लेजिम कुठेतरी मागे पडली आणि तिची जागा डीजेच्या धडाक्याने अन् बँजोच्या तालाने घेतली. पण संगमनेर तालुक्यातील मुंजेवाडी गावाने या परंपरेला पुनरुज्जीवित करत संस्कृती जपण्याचा एक नवा आदर्श निर्माण केला आहे.



आम्ही असू नसू, पण आमची संस्कृती जगायला हवी या एकाच विचाराने मुंजेवाडीतील ग्रामस्थांनी पुढाकार घेतला आहे. काळाच्या पडद्याआड चाललेली ही लोककला गावातील नव्या पिढीच्या हातात सोपवण्यासाठी त्यांनी मंदिराच्या प्रांगणात लेजिम वर्गाची सुरुवात केली आहे.

**स्क्रीन सोडून मुले मैदानावर..!**

आता रोज संध्याकाळ झाली की मुंजेवाडीतील मंदिराचे प्रांगण एका वेगळ्याच उत्साहाने भरून जाते. पांढऱ्या कपड्यातील जुनी जाणती माणसे हातात लेजिम व वाद्ये घेऊन उभी असतात आणि त्यांच्यासमोर लहानांपासून ते तरुणांपर्यंतची नवी फळी ही लोककला शिकताना दिसते. विशेष म्हणजे, गावातील आई-वडीलसुद्धा स्वतः हून आपल्या पाल्यांना मोबाईल आणि डिजिटल स्क्रीनपासून दूर करून या वर्गात आणून सोडत आहेत.

**'मुंजेवाडी पॅटर्न'चे सर्वत्र कौतुक...**

डीजेच्या कर्कश आवाजात मूळ लोककला आणि शारीरिक व्यायाम देणारा हा पारंपरिक खेळ हरवत चालला होता. परंतु, ग्रामस्थांचे मार्गदर्शन आणि लहान मुलांचा उत्स्फूर्त सहभाग पाहून आजूबाजूच्या परिसरात मुंजेवाडीच्या या उपक्रमाचे मोठे कौतुक होत आहे. ही केवळ लेजिम शिकवणी नसून एका पिढीने दुसऱ्या पिढीच्या हातात सोपवलेला 'संस्कृतीचा जिवंत वारसा' ठरत आहे.

या अनोख्या उपक्रमाबाबत माहिती देताना गावचे ग्रामस्थ दत्तात्रय चौधरी, संजय देवकर, प्रफुल्ल कापसे, दत्तात्रय साबळे आदींनी हा सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी गावातील सर्वांचे सहकार्य लाभत असल्याचे सांगितले.

**ग्रामपंचायत निवी गेव्हंडे तालुका राजगड जिल्हा पुणे**

**बी १ जाहिर निविदा नोटीस नंबर ०२ सन २०२६-२०२७**

ग्रामपंचायत निवी गेव्हंडे तालुका राजगड जिल्हा पुणे हे खालील कामासाठी सीलबंद निविदा जिल्हा परिषदेकडील योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदारकडून निविदा मागवित आहे मोहरबंद अर्ज दिनांक: २८-०९-२०२६ ते ०४-१०-२०२६ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय निवी गेव्हंडे येथे स्वीकारली जातील. सदरच्या निविदा दिनांक: ०५-१०-२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालय निवी गेव्हंडे ता. राजगड या ठिकाणी उघडण्यात येतील.

| अ. क्र | कामाचे स्वरूप | कामाची अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा शुल्क | अनामत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे गेव्हंडे ता. राजगड येथे अंतर्गत रस्ता करणे. | ८४६३७१/- | ५९०/- | ८४६४/- | ६ महीने |

**अटी व शर्ती:**
१) कोणतेही निविदा अर्ज स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा फेटाळणेचा अधिकार ग्रा.प ने राखून ठेवला आहे
२) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.
३) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी प्रमाणपत्र, G.S.T प्रमाणपत्र, PAN कार्ड अनुभव प्रमाणपत्र व पूर्ण भरलेली निविदा जोडणे आवश्यक आहे.
४) इसारा रक्कम कोणत्याही बँकेवरील धनादेश डी. डी ग्रामपंचायत निवी गेव्हंडे या नावाने काढून तो लिफाफा क्र १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्रमांक ०२ उघडण्यात येणार नाही.
५) सदरचे कामे हे मा. उपअभियंता, शाखा अभियंता जि.प बांधकाम उपविभाग राजगड व सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणे आवश्यक आहे.
६) काम पूर्ण झाल्यानंतरच कामाचे देयक अदा करण्यात येईल.

सही
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत निवी गेव्हंडे ता. राजगड जि. पुणे

सही
प्रशासक/सरपंच
ग्रामपंचायत निवी गेव्हंडे ता. राजगड जि. पुणे

## द•ख•ल

### निघोज सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी

**निघोज :** निघोज सोसायटीची ७५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि.२९ रोजी संस्थेच्या सभागृहात सकाळी ९ वाजता संस्थेचे अध्यक्ष सुनील वराळ यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती संस्थेचे सचिव व संचालक मंडळाने दिली आहे. संस्थेची मोठ्या प्रमाणात प्रगती झाली असून शेतकऱ्यांना उर्जीत अवस्थेत आणणारी म्हणून सोसायटीचा नावलौकिक तालुक्यात आहे. जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून सोसायटीला अनेक योजनांचा लाभ मिळाला असून शेतकरी हिताचे निर्णय निघोज सोसायटीने घेतल्याने सोसायटी माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मोठ्या प्रमाणात मिळाला आहे. शेतकरी विकास हेच ध्येय संस्थेचे चेअरमन सुनिल वराळ व त्यांच्या संचालक सहकाऱ्यांनी ठेवल्याने शेतकरी हिताचे निर्णय घेऊन शेतकरी आर्थिक समृद्ध झाला आहे. सोसायटी वार्षिक सभेसाठी सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संचालक मंडळानी केले आहे.

### निघोज स्मशानभूमी सुशोभीकरणासाठी कवाद बंधूकडून १ लाख १ हजाराची देणगी

**निघोज :** ग्रामीण संस्था परिवाराचे संस्थापक अध्यक्ष स्व. बाबासाहेब कवाद यांच्या आठव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त जी एस महानगर बँकेचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद, बाबासाहेब कवाद ग्रामीण विकास सेवाभावी संस्थेचे उपाध्यक्ष प्रकाशशेठ कवाद व मळगंगा



ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष तथा बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद सर या कवाद बंधूंनी निघोज येथील स्मशानभूमी सुशोभीकरणासाठी १ लाख १ हजार रुपये देणगी दिली आहे. यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अमृताशेठ रसाळ व शांताराम कळसकर व रामदासशेठ वरखडे यांनी सांगितले की निघोज ग्रामीण संस्था परिवाराचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद यांनी पतसंस्था, फलोद्यान संस्था , मळगंगा ट्रस्ट व न्यू इंग्लिश स्कूल यांची स्थापना करताना या संस्थेच्या माध्यमातून परिसराचा विकास झाला पाहिजे, शेतकरी व सर्व सामान्य जनतेला पाठबळ मिळाले पाहिजे व गरीब गरजू लोकांना आधार मिळाला पाहिजे हा उद्देश ठेऊन समाजहिताची संकल्पना ठेवली होती. गेली ५० वर्षातील कार्यकाळात स्व. कवाद यांनी सॉलिसिटर गुलाबराव शेळके यांच्या पुढाकारातून स्थापन झालेल्या जी एस महानगर बँकेचे संस्थापक उपाध्यक्ष म्हणून समाजहितासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले. मुंबई स्थायीक असलेल्या अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील लोकांना या बँकेने मोठ्या प्रमाणात आर्थिक आधार दिल्याने या दोन्ही जिल्ह्यांतील जनतेला आर्थिक समृद्धी प्राप्त झाली आहे.

### वासुंदे गावासाठी अभिमानास्पद क्षण!



**पारनेर :** आळंदी येथील संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी मंदिराजवळ आज भक्तिमय वातावरणात अनावरण करण्यात आले. हे मनमोहक पेंटिंग आता समाधी मंदिरात कायमस्वरूपी लावण्यात येणार आहे. त्यामुळे आळंदीला येणाऱ्या देश-विदेशातील लाखो भाविकांना वर्षानुवर्षे या पेंटिंगचे दर्शन घेता येणार आहे. या उपक्रमामुळे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पावन चरणी वासुंदे गावाचे नाव कायमस्वरूपी झळकणार असल्याने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे. या अनावरण सोहळ्याप्रसंगी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान देवस्थान समितीचे अध्यक्ष श्री चैतन्य महाराज लोंढे, गिरी महाराज तसेच वासुंदेकर मित्रमंडळी आणि मान्यवर उपस्थित होते. वासुंदेच्या या सुपुत्राच्या कलागुणांचा आणि भावभक्तीचा गौरव सर्व स्तरातून केला जात असून क्षीरसागर सरांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### जिल्हा परिषदेच्या शाळा म्हणजे आदर्श संस्कार केंद्र : हभप निवृत्ती महाराज देशमुख



**टाकळी ढोकेश्वर :** जिल्हा परिषदेच्या शाळा म्हणजे आदर्श संस्कार केंद्र असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध कीर्तनकार हभप निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांनी केले. वडगाव सावताळ येथील एक आदर्श शिक्षक कै.सुदाम मारुती रोकडे गुरुजी पुण्यस्मरणानिमित्त आयोजित किर्तनसेवेत निवृत्ती महाराज यांनी बोलताना समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषदेच्या शाळा टिकल्या पाहिजेत कारण त्या जर बंद झाल्या तर गोरगरीबांसाठी शिक्षणाची दारे कायमची बंद होतील खरे गुणवत्ता धारक गुरुजी तर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्येच आहेत या जिल्हा परिषदेच्या शाळाच खऱ्या व आदर्श संस्काराची केंद्र आहेत तेथूनच खरे गुणवत्ता पूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळते असे सांगितले.रोकडे गुरुजींच्या पुण्यस्मराणानिमित्त त्यांचे चिरंजीव सरपंच संजय रोकडे व सुनिल रोकडे गुरुजी यांनी वडगाव सावताळ गावातील सर्व वाडीवस्तीवरील शाळेतील एक गुणवान विद्यार्थ्याची निवड करून त्यांचा ट्राफी व रोख रक्कम देऊन ह भ प इंदुरीकर महाराज यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला उपस्थित जनसमुदयासमोर बोलताना इंदोरीकर यांनी त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी खा.डॉ.निलेश लंके,राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दीपक लंके,उद्योजक प्रा.संजय लाकूडझोडे सर,मा. नगराध्यक्ष दिलीप भालेकर,बाजार समितीचे सभापती गंगारामशेठ बेलकर,कार्यकारी अभियंता आनंद रुपनर,उपअभियंता प्रदीप पंडीत साहेब,खरेदी विक्री संघाचे मा चेअरमन ड.बाबासाहेब खिलारी,निलेश लंके प्रतिष्ठानचे बाळासाहेब खिलारी गुरुजी, गुरुदत्त पतसंस्थेचे चेअरमन बा ठ झावरे,मोहनराव रोकडे, अशोकराव घुले,प्रकाश गाजरे,आर आर राजदेव, अमोल उगले,शिक्षक नेते रावसाहेब राहोकले,संतोष खामकर आदी उपस्थित होते.

# सहकारी संस्थांना राजकारणाचे अड्डे बनवू नये : आ. राजळे

**अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** तालुक्यामध्ये दुष्काळाची पार्श्वभूमी पाहता सहकारातील संस्थांनी अवाजवी खर्च टाळून संस्थेपुढील आर्थिक संकट टाळावे. सहकारातील संस्था राजकारणाचे अड्डे बनवू नयेत. राजळे कुटुंबाप्रमाणेच ज्येष्ठ नेते स्व.बबनराव ढाकणे, माजी आमदार स्व.बाबूजी आव्हाड व स्व. रामभाऊ अकोलकरांसारख्या नेत्यांनी सहकाराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मोठे योगदान देत सहकारामध्ये कधीही राजकारण पाहिले नाही अशी माहिती आ. मोनिका राजळे यांनी दिली.

अप्पासाहेब राजळे मंगल कार्यालयात तालुका खरेदी विक्री संघाच्या १०० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे त्या बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष अभय आव्हाड, माजी नगराध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, बाजार समितीचे सभापती ऍड. सुभाष बर्डे, ज्येष्ठ नेते उद्धव वाघ, नंदकुमार शेळके, माजी संचालक सिताराम बोरुडे ,विष्णुपंत अकोलकर, माजी सरपंच तथा ज्येष्ठ नेते गजानन कोष्टी, आदींसह पदाधिकारी संचालक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. राजळे म्हणाल्या, सहकार क्षेत्रातील एखादी संस्था शंभरी पार करत प्रगतीची घोडदौड सुरू ठेवते, ही गोष्ट कौतुकास्पद आहे. जिल्ह्यातील नामांकित व सक्षम



सहकारी संस्थांच्या यादीत तालुका खरेदी विक्री संघाचे नाव वरच्या क्रमांक वर आहे. या संस्थेची ऊर्जेतावस्था माजी आमदार स्व. राजीव राजळे यांच्या कारकिर्दी पासून सुरू झाली. संघाच्या पेट्रोल पंपावर अन्य पेट्रोल पंप पेक्षा ज्यादा भावाने इंधन विक्री होण्यामागे तांत्रिक अडचणी आहेत.कंझुमर पंप व रिटेल पंप असे दोन प्रकार असतात. संघाचा पंप कंझुमर पंप असल्याने कंपन्यांकडून जास्त भावाने माल दिला जातो. ग्राहकांची अडवणूक होऊ नये म्हणून ना नफा ना तोटा तत्त्वावर माल विकून वाढीव पैशाचे प्रमाण कमी केले आहे. यातून ग्राहकांना दिलासा देण्याचा प्रयत्न होत आहे. कंपन्यांबरोबर याबाबत बोलणे चालू असल्याने लवकरच या समस्येतून मार्ग नि घेल.

सहकारी संस्थांच्या सत्व परीक्षेचा कालावधी सध्या दुष्काळामुळे सुरू झाला आहे. अनावश्यक खर्च टाळत, कार्यक्षम कारभार करत स्पर्धेच्या काळात टिकून राहावे लागेल. तालुका खरेदी विक्री संघाला पूर्वी नांगर सोसायटी या नावाने ओळखले जाई. त्याकाळी कृषी क्षेत्र बरोबरच सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे काम संघाकडे होते. सध्या मंगल कार्यालय व पेट्रोल पंप असे दोनच स्त्रोत उत्पन्नाचे असून नजीकच्या काळात यामध्ये संचालक मंडळाकडून वाढ होणार असून काळानुरूप व्यवसाय पद्धतीतही बदल केले जातील. संस्थेच्या प्रगतीसाठी संचालक मंडळ प्रामाणिकपणे काम करत असून येणाऱ्या काळात व्यापारी संकुलाचे उत्पन्न सुद्धा सुरू होईल. गटतट, पक्षीय मतभेद, अडथळे बाजूला ठेवत दुष्काळाशी सामना करायला सर्वजण एकत्रित या. दिसते त्यापेक्षा भयंकर परिस्थिती असून प्रत्येकाने जबाबदारीने काम करावे असे आवाहन राजळे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष संदीप पठाडे, सूत्रसंचालन राजीव सुरवसे तर आभार पोपट कराळे यांनी मानले. संस्थेचे व्यवस्थापक निलेश भुकन यांनी मान्यवरांचे स्वागत करून अहवाल वाचन केले दुष्काळी परिस्थितीमुळे हार तुरे व सत्कार समारंभ रद्द करण्यात आला.

## अंगारखी चतुर्थी निमित्त आव्हाणे गणपती येथे यात्रा उत्सवाचे आयोजन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :** शेवगाव तालुक्यातील आव्हाणे बु श्री निद्रिस्त गणपती मंदिर येथे मंगळवार दि.२९ सप्टेंबर रोजी अंगारखी चतुर्थी निमित्ताने भव्य यात्रा उत्सवाचे व विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ७ वा पैठण वरून आणलेल्या गंगेच्या पाण्याने श्रीची आरती व महाभिषेक मच्छिंद्र बाजीराव नांगरे,आव्हाणे बु यांच्या हस्ते होणार असून दुपारी १२ वाजता भाविकांना फराळाची व्यवस्था नांगरे यांच्यावतीने करण्यात आली आहे.तसेच सकाळी ९.३० ते ११.३० वा हभप बबन महाराज बहिरवाल, मदन महाराज संस्थान, कडा यांचे जाहीर हरिकीर्तन होईल. बाबासाहेब चोथे यांच्या शुभहस्ते संत पूजन व केळीचे वाटप होईल.तसेच गणपती मंदिर ट्रस्ट येथे सकाळी ९ ते ५ यावेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.तसेच सायं ७ वा श्रीची आरती व महाभिषेक दिलीप कळमकर,आव्हाणे बु व अरुण



तनपुरे,भालगाव यांच्या हस्ते होणार आहे.रात्री ९ वा भाविक भक्तासाठी कळमकर व तनपुरे यांच्यावतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच संध्याकाळी १० वा. दादोबा देव एकतारी भजनी मंडळाचा जागराचा कार्यक्रम होईल.

तरी या धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा,असे आवाहन श्री निद्रिस्त गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष प्रा.मालोजीराव भुसारी सर,सरचिटणीस अर्जुनराव सरपते, का कार्यालयीन सचिव लक्ष्मणराव मुटकुळे व माजी विश्वस्त अंकुश कळमकर,रामदास दिवटे,कारभारी तळेकर,सुधाकर चोथे,नारायण जाधव यांनी दिली आहे.

## सभासदांना १२ टक्के लाभांश देणार : आ. दाते

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**पारनेर :** ग्रामीण पतसंस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार रोजी संस्थापक चेअरमन तथा पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली मनकर्णिका लॉन्स, पारनेर येथे संपन्न झाली. यावेळी संस्थेचे व्हा. चेअरमन सुरेश बोरुडे, संचालक बाळासाहेब सोबले, रखमाजी कापसे, लक्ष्मण डेरे, मयूर गांधी, अर्जुन गाजरे, राजेंद्र औटी, कृष्णा उमाप, सुभाष राठोड, दिलीप दाते, सुनील गाडगे, सुंदा दाते व आशा तराळ तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले, शिक्षण महर्षी डॉ. वाय. पाटील व अहवाल सालातील दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी सेवानिवृत्त एसीपी डॉ. सिताराम कोल्हे, ए.टी.सी.सी. बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, मा. जि.प. सदस्य वसंतराव चेडे, मा उपनगराध्यक्ष दत्तात्रय कुलट, मा. संचालक विठ्ठलराव औटी, मा. सरपंच जयसिंग मापारी यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

त्यानंतर संस्थेला सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात ३ कोटी ३ लाख १२ हजार ६१७ निव्वळ नफा व ऑडिट वर्ग अ मिळाल्याबद्दल मा. चेअरमन काशिनाथ दाते सर यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना सांगितले. संस्थेची बँक गुंतवणूक १०४ कोटी असून, स्थावर मालमत्ता ३ कोटी ५४ लाख आहे. संस्थेमार्फत सभासदांना १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. सभासदांना त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी व व्यवसायासाठी १७५ कोटी रुपये कर्ज वितरित केले आहे.

संस्थेचे अहिल्यानगर, पुणे, ठाणे व मुंबई जिल्हा कार्यक्षेत्र असून संस्थेच्या पारनेर, टाकळी ढोकेश्वर, अळकुटी, बेलवंडीफाटा, जामगाव, नारायणगव्हाण, आळेफाटा, सुपा, कामोठे, अहिल्यानगर, वनकुटे, ढवळपुरी, भोसरी, खडकवाडी, मांडवे खुर्द, पळशी व शिरूर अशा १७ शाखा सुरू आहेत, संस्थेचे चेअरमन काशिनाथ दाते यांनी सांगितले.

> संस्थेचे २३ वर्षांच्या कालावधीत मार्च २०२६ अखेर २५१ कोटी रुपयांच्या ठेवी जमा झालेल्या आहेत. हे सभासदांनी संस्थेवर ठेवलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. संस्थेच्या ठेवी मार्च २०२७ अखेर ३०० कोटींचा टप्पा पार करणार असल्याचा विश्वास आहे.
>
> **सुरेश बोरुडे, व्हा. चेअरमन**

संस्थेच्या पारनेर, टाकळी ढोकेश्वर, जामगाव, कामोठे, खडकवाडी, आळेफाटा, शिरूर व सुपा येथे स्वमालकीच्या इमारती आहेत. संस्थेने पारनेर, टाकळी ढोकेश्वर, अळकुटी, सुपा, बेलवंडीफाटा, जामगाव, ढवळपुरी येथे सभासदांना लॉकर सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेतील सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. व सभा खेळीमेळीत संपन्न झाली. सभेचे सूत्रसंचालन रखमाजी कापसे यांनी केले. व्हा. चेअरमन सुरेश बोरुडे यांनी आभार मानले. यावेळी सभासद व कर्मचारी उपस्थित होते. संस्थेच्या सभासदांना संस्थेमार्फत मिष्टान्न भोजन सभा संपल्यानंतर देण्यात आले.

## चावंडच्या प्रसन्नगडावर हजारो मावळ्यांचे श्रमदान

### खा. लंके यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता, डागडुजी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची साक्ष देणाऱ्या गड-किल्ल्यांचे संवर्धन, स्वच्छता आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा संकल्प रविवारी (दि. २७) जुन्नर तालुक्यातील चावंड किल्ल्यावर प्रत्यक्ष श्रमदानातून साकारला. खा. डॉ. निलेश लंके यांच्या संकल्पनेतून आणि 'आपला मावळा' संघटनेच्या माध्यमातून सुरू असलेल्या गडकोट संवर्धन मोहिमेअंतर्गत चावंड किल्ला अर्थात प्रसन्नगडावर हजारो मावळ्यांनी सहभाग घेतला.

या मोहिमेसाठी खा. लंके शनिवारी रात्रीच शिवजन्मभूमी जुन्नर येथे दाखल झाले. जुन्नर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचे स्वागत करण्यात आले. खा. लंके यांनी चावंड येथील प्राथमिक शाळेत रात्रीचा मुक्काम केला. लोकप्रतिनिधीच्या या साधेपणाची परिसरात चर्चा झाली.




रविवारी सकाळपासूनच चावंड परिसरात गडकोट संवर्धन मोहिमेचा उत्साह जाणवत होता. पारंपरिक पद्धतीने खा. लंके यांची बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली. परिसरातील महिलांच्या लेझीम पथकाने लेझीमच्या तालावर सादरीकरण केले.

त्यानंतर खा. लंके यांच्या नेतृत्वाखाली हजारो मावळे चावंड किल्ल्यावर पोहोचले. गडाच्या विविध भागांमध्ये स्वच्छता करण्यात आली. गडावरील आवश्यक ठिकाणी डागडुजी आणि संवर्धनाची कामे करण्यात आली. या मोहिमेत पुणे जि. प.चे माजी अध्यक्ष देवराम लांडे, सदस्य माई लांडे, सूरज वाजगे, अमोल लांडे, सरपंच सुमन लांडे यांच्यासह हजारो मावळे सहभागी झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाशी निगडित गड-किल्ल्यांचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजाचीही सामूहिक जबाबदारी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराम लांडे यांनी खा. लंके यांच्या गडकोट संवर्धन उपक्रमाचे कौतुक केले. 'आपला मावळा' संघटनेच्या माध्यमातून या कार्यात सहभागी होऊन गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## दुर्गामातेच्या जयघोषात शिराळ येथे रंगला पौर्णिमा उत्सव

### हजारो भाविकांनी घेतला पारंपरिक 'आमटी-भाकरी'चा महाप्रसाद!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शिराळ चिचोंडि :** पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र शिराळ येथील अत्यंत जागृत आणि प्रसिद्ध दुर्गा माता देवस्थान येथे पौर्णिमेच्या पावन पर्वावर भाविकांचा मोठा जनसागर उसळला होता. 'ज्ञानबा-तुकाराम' आणि देवीच्या जयघोषात हजारो भाविकांनी महाआरतीचा लाभ घेत पारंपरिक व चमचमीत 'आमटी-भाकरी' महाप्रसादाचा मनमुराद आस्वाद घेतला.

नगर तालुक्यातील प्रसिद्ध श्रीक्षेत्र आगडगाव येथील श्री काळभैरवनाथ देवस्थानाच्या आमटी-भाकरी महाप्रसादाच्या धर्तीवर शिराळ येथील दुर्गा माता देवस्थानने हा उपक्रम सुरू केला आहे. गेल्या ३५ ते ४० वर्षांपासून ही समृद्ध धार्मिक परंपरा अविरतपणे सुरू आहे. दर महिन्याच्या पौर्णिमेला येथे विविध धार्मिक विधी, महाआरती आणि सायंकाळी ७ वाजता महाप्रसादाचे आयोजन केले जाते. या उपक्रमामुळे परिसरातील तरुणाई आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने भक्तीमार्गाकडे आकर्षित होत आहेत.

या महिन्याच्या पौर्णिमा पर्वाचे औचित्य साधून शिराळ येथील स्थानिक रहिवासी पाथरकर परिवाराच्या वतीने महाप्रसादाचा कार्यक्रम अत्यंत व्यापक आणि नियोजनबद्ध रीतीने पार पडला. पाथरकर कुटुंबाकडून संपूर्ण मंदिर परिसरात आकर्षक व नेत्रदीपक फुलांची सजावट करण्यात आली होती.



सायंकाळी ७ वाजता देवीच्या महाआरतीनंतर बाजरीची भाकरी, गरमागरम आमटी, कांदा, लिंबू, झणझणीत ठेचा आणि गोड शिरा अशा परिपूर्ण महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. पाथरकर परिवाराने मनोभावे तब्बल २५०० हून अधिक भक्तांना या महाप्रसादाची पंगत दिली. शिराळ देवस्थानाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे येथे महाप्रसादाचे अन्नदान करण्यासाठी भाविकांमध्ये मोठी चढाओढ पाहायला मिळते. जिल्हाभरातून अनेक भाविक अन्नदानासाठी नावनोंदणी करतात. विशेष म्हणजे, या अन्नदानाच्या सेवेसाठी भाविकांना तब्बल ३ ते ४ वर्षे प्रतीक्षा (वेटिंग) करावी लागते. यावरून शिराळच्या दुर्गा माता देवस्थानावर भाविकांची असलेली अथांग श्रद्धा स्पष्ट होते. शासनाकडून श्रीक्षेत्र शिराळ देवस्थानाला तीर्थक्षेत्राचा 'क' वर्ग दर्जा मिळाला आहे. देवस्थान ट्रस्टच्या वतीने भक्तांसाठी भक्तनिवास, अन्नछत्रालय आणि प्रतीक्षालायाची उत्तम व्यवस्था उभारण्यात आली आहे. 'नवसाला पावणारी देवी' म्हणून ख्याती असलेल्या या मंदिरात शारदीय व चैत्र नवरात्रोत्सवात मोठा उत्सव साजरा होतो.

# दुष्काळाच्या संकटात आ. दाते शेतकऱ्यांच्या बांधावर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** खरीप हंगाम २०२६ मध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी आज शासकीय अधिकाऱ्यांसह तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी वडनेर हवेली व पारनेर येथील शेतशिवारात पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला.

शासनाने दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर २६५ तालुक्यांमध्ये ढीळससशी-१ लागू करून पंचनाम्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या या पाहणीदरम्यान शेतकरी प्रतिनिधींनी आपल्या व्यथा आमदार दाते सर यांच्यासमोर मांडल्या. सोयाबीनसारख्या पिकाची पेरणी करण्यासाठी एकरी दहा हजार रुपयांपेक्षा अधिक खर्च, वाढता मजुरीचा दर, वाढता उत्पादन खर्च आणि त्यातच पिकांची झालेली निराशाजनक अवस्था यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या मोठ्या अडचणीत सापडल्याचे त्यांनी सांगितले. पिकासाठी केलेला खर्चही निघण्याची शाश्वती नसताना नैसर्गिक संकटाने शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान उभे



केले आहे.

या परिस्थितीत केवळ पंचनामे होणे पुरेसे नसून पंचनामे वस्तुनिष्ठ, पारदर्शक आणि प्रत्यक्ष नुकसानीचे प्रतिबिंब दाखवणारे असणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा शेतकरी प्रतिनिधींनी व्यक्त केली. शासनाने २६५ तालुक्यांमध्ये पंचनाम्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले असून पिकांची प्रत्यक्ष स्थिती, छायाचित्रे आणि आवश्यक माहितीच्या आधारे अहवाल सादर करण्याची कार्यवाही अपेक्षित आहे.

आमदार दाते म्हणाले, काल आदेश मिळताच आज संबंधित अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यतत्परतेवर शंका घेण्याचे अजिबात कारण नाही. संपूर्ण मतदारसंघातील सर्व शेतकऱ्यांचे पंचनामे केले जातील. मात्र एक-दोन दिवस पंचनाम्याच्या प्रक्रियेत मागेपुढे झाले, तर शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या प्रत्यक्ष कामकाजातील मर्यादा समजून घेऊन सहकार्य करावे.

पारनेरच्या तहसीलदार गायत्री सौंदाणे, तालुका कृषी अधिकारी गजानन घुले आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांनी संबंधित तलाठी, कृषी सहाय्यक आणि ग्रामसेवकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना दिल्याचे आमदार दाते सर यांनी यावेळी स्पष्ट केले.

> संपूर्ण मतदारसंघातील कुठल्याही शेतकऱ्यावर अन्याय होता कामा नये. एकही शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहणार नाही, याची प्रशासनाने काळजी घ्यावी. दुष्काळी परिस्थितीत आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष बांधावर पोहोचणारी यंत्रणा, अचूक पंचनामे आणि पात्र शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचणे महत्त्वाचे आहे. या संपूर्ण प्रक्रियेत प्रशासन आणि शेतकरी यांच्यातील समन्वयाची भूमिका निर्णायक ठरणार असल्याने प्रशासन व नागरिकांनी एकमेकांबद्दल सहकार्याची भूमिका ठेवावी.
>
> **आ. काशिनाथ दाते**

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

मंगळवार दि.२९ सप्टेंबर २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# ‘तुमची परीक्षा एमपीएससी-यूपीएससीची, आमची निवडणुकीची!’

## डॉ. सुजय विखे पाटील यांचा संघर्षातून यशाचा मंत्र; राजकारणासाठी कर्जबाजारी होऊ नका

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : तुमच्यासाठी एमपीएससी-यूपीएससीची परीक्षा आहे, तर आमच्यासाठी निवडणुकीची परीक्षा आहे. अपयशानंतर पुन्हा उभे राहून यश मिळवणे, हाच जीवनातील संघर्षाचा मंत्र आहे, असे प्रतिपादन भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. नांदूर खंदरमाळ येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षा तसेच पोलीस भरतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा जाहीर गौरव व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ. विखे पाटील बोलत होते. कार्यक्रमास आमदार अमोल खताळ, पत्रकार प्रशांत आहेर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन माजी जिल्हा परिषद सदस्य जनार्दन आहेर यांनी केले होते.

सर्वसामान्य आणि गोरगरीब कुटुंबातील मुले शिक्षणाच्या बळावर शासकीय सेवेत पोहोचतात, हा आनंदाचा क्षण असल्याचे सांगून डॉ. विखे पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. आज संघर्ष करून अधिकारी झालेली हीच मुले उद्या मोठ्या पदांवर पोहोचतील. आपल्या गावातील एखादी व्यक्ती मोठ्या पदावर गेल्यानंतर त्याचा फायदा केवळ कुटुंबाला नव्हे, तर संपूर्ण गावाला होतो. गरीब आणि सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करता यावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नियोजनाच्या माध्यमातून दरवर्षी निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे डॉ. विखे पाटील म्हणाले.

### ‘मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य द्या’

राजकीय स्पर्धेपेक्षा कुटुंब, मुलांचे शिक्षण आणि आई-वडिलांचे कल्याण यांना प्राधान्य देण्याचे आवाहन डॉ. विखे पाटील यांनी केले. राजकारणासाठी कर्जबाजारी होऊ नका; मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करा. सरपंच एकच होणार, आमदार एकच होणार, खासदारही एकच होणार; मात्र शिक्षणातून मिळणारे यश अनेक पिढ्यांना पुढे नेते, असे ते म्हणाले. शाळांमध्ये वर्गखोल्या, संगणक, डिजिटल बोर्ड, मुलींसाठी स्वच्छतागृहे आणि शुद्ध पाण्याच्या सुविधा उपलब्ध होणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### सबस्टेशनचा प्रश्न वर्षभरात मार्गी लावण्याचा शब्द

नांदूर खंदरमाळ परिसरातील सबस्टेशनच्या प्रश्नावर डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट भूमिका मांडली.

जे शक्य आहे त्याला ‘हो’ आणि जे शक्य नाही त्याला स्पष्ट ‘नाही’ सांगणे, हीच माझी कार्यपद्धती आहे. एकदा ‘हो’ म्हटल्यानंतर ते काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे ही माझी भूमिका आहे, असे सांगत त्यांनी सबस्टेशनचा प्रश्न वर्षभरात मार्गी लावण्याचा शब्द दिला.

कार्यक्रमात एमपीएससी, विविध स्पर्धा परीक्षा तसेच पोलीस भरतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी किशोर डोके,कपिल पवार,सुभाष पाटील आहेर,घारगाव गावचे सरपंच नितीन आहेर, गुलाबराजे भोसले,बाळासाहेब सागर,प्रमोद रहाणे, रोहित चौधरी, अशोकराव कानवडे, सुनंदाताई भागवत, गणेश सुपेकर, ज्ञानेश्वर सुपेकर, विजय सुपेकर, दत्तामामा गाडेकर, पोपट सुपेकर,पांडुरंग धुमाळ, दत्ता पाटील सुपेकर, अजित मोरे, पंढरीनाथ भागवत, तुषार कंजेकर,दिलीप गाडेकर यांचेसह नांदूर खंदरमाळ तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला, विद्यार्थी, पालक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### यांचा सत्कार करण्यात आला...

या सोहळ्यात अमोल भागवत (महसूल सहायक, मंत्रालय), मयुर करंजेकर (बी.एम.सी. कार्यकारी सहायक), ऋषिकेश सुपेकर (पोलीस उपनिरीक्षक), वृषभ सुपेकर (पुणे पोलीस), नूतन पवार (महाराष्ट्र पोलीस), पल्लवी कान्होरे (मुद्रांक शुल्क अधिकारी आणि राज्य विक्रीकर अधिकारी), आकाश भागवत (महसूल सहायक), विकास मोरे (पोलीस उपनिरीक्षक), विजय भोईटे (महाराष्ट्र पोलीस) आणि डॉ. प्रिया वाकळे (डॉक्टर) यांचा डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# लोंबकळलेल्या तारांच्या घर्षणाने अडीच एकर ऊसाची होळी

भोकर, खोकरमधील घटना; शेतकऱ्यांचा महावितरणला आंदोलनाचा इशारा



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**भोकर** : श्रीरामपूर तालुक्यातील भोकर व खोकर शिवारात वीजवाहक तारांचे घर्षण होऊन लागलेल्या आगीत दोन ठिकाणी अडीच एकर ऊस जळून खाक झाला. महावितरणच्या दुर्लक्षामुळे वीजवाहक तारा लोंबकळत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असून, तातडीने तारांची दुरुस्ती न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

भोकर शिवारातील वडजाई परिसरातील गट क्रमांक १४० मध्ये गोरक्षनाथ मोहन फासाटे यांचा दोन एकर आडसाली ऊस आहे. सोमवारी (२८ सप्टेंबर) दुपारी बाराच्या सुमारास वीजवाहक तारांमध्ये घर्षण होऊन ठिणग्या खाली पडल्याने ऊसाने पेट घेतला. आग लक्षात येताच परिसरातील शेतकऱ्यांनी धाव घेत आग विझविण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे फासाटे यांचा एक एकर तसेच लगतच्या दिनकर चव्हाण यांचा एक एकर ऊस वाचविण्यात यश आले. खोकर येथे खोकर-टाकळीभान रस्त्यालगत गट क्रमांक २० मध्ये रेवन्नाथ भणगे व कैलास भणगे यांच्या क्षेत्रातील ऊसालाही वीजवाहक तारांच्या घर्षणामुळे आग लागली. दुपारचे कडक ऊन आणि वाऱ्यामुळे आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले. श्रीरामपूर नगरपालिकेचे अग्निशमन वाहन घटनास्थळी दाखल झाले; मात्र रस्ता नसल्याने ते आगीपर्यंत पोहोचू शकले नाही. परिसरातील शेतकरी तरुणांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत भणगे बंधूंचा दीड एकर ऊस जळाला. प्रसंगावधान राखल्याने लगतचे ३० ते ३५ एकर ऊस पीक वाचले. शेतकऱ्यांनी घेतले जीव धोक्यात घालून प्रयत्न भोकर येथील आग विझविण्यासाठी धनंजय वडघुले, कैलास चव्हाण, विष्णू चव्हाण, दिनकर चव्हाण, कार्तिक चव्हाण, युवराज चव्हाण, तुषार फासाटे, राजू तागड, नानासाहेब तागड, अशोक तागड, रोहिदास तागड, नवनाथ बेरड व ज्ञानदेव बेरड यांनी विशेष प्रयत्न केले.

### लोंबकळलेल्या तारांचा धोका कायम

महावितरणच्या कार्यक्षेत्रातील अनेक वीजवाहक तारा शेतांमधून हाताच्या अंतरावर लोंबकळत आहेत. ऊस पिके काढणीच्या अंतिम टप्प्यात असताना अशा तारांमुळे आग लागण्याचा धोका वाढला आहे. शेतकरी रात्री-अपरात्री पिकांना पाणी देण्यासाठी शेतात ये-जा करतात. त्यामुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. महावितरणने तातडीने लोंबकळलेल्या तारांची दुरुस्ती करून त्या उंच कराव्यात; अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

# गौतमनगरच्या मैदानावर राज्यस्तरीय हॉकीचा थरार

## जवाहरलाल नेहरू हॉकी कपला दिमाखात प्रारंभ



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : गौतमनगर येथील गौतम पब्लिक स्कूलच्या भव्य हॉकी मैदानावर राज्यातील युवा हॉकीपटूंच्या कौशल्याचा थरार रंगला आहे. क्रीडा व युवा सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर आणि गौतम पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय राज्यस्तरीय जवाहरलाल नेहरू हॉकी कप क्रीडा स्पर्धा २०२६-२७चा दिमाखदार प्रारंभ झाला. राज्यातील विविध विभागांतील १५ व १७ वर्षांखालील संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला आहे.

कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन तथा माजी आमदार अशोकराव काळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी प्रतिकात्मक हॉकी स्टिकचे अनावरण करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी खेळाडूंशी संवाद साधत त्यांना शुभेच्छा दिल्या. अहिल्यानगर जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी गौतम पब्लिक स्कूलचे मैदान हॉकीचे माहेरघर असल्याचे सांगितले. खेळाडूंनी शिस्तीचे पालन करून पंचांच्या निर्णयाचा आदर करावा, असे आवाहन त्यांनी केले. उद्घाटनानंतर १५ वर्षांखालील गटात छत्रपती संभाजीनगर विभागाच्या रेजिमेंटल चिल्ड्रन हायस्कूल आणि पुणे विभागाच्या गौतम पब्लिक स्कूल यांच्यात सामना झाला. गौतम पब्लिक स्कूलने ५-० गोलने विजय मिळवत दिमाखदार सुरुवात केली.

१५ वर्षांखालील गटात आठ, तर १७ वर्षांखालील गटात विविध विभागांतील संघ सहभागी झाले आहेत. २९ सप्टेंबर रोजी उपांत्य व अंतिम सामने होणार असून ३० सप्टेंबर रोजी १७ वर्षांखालील मुलींचे सामने खेळविले जाणार आहेत. विजेते संघ दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करणार असल्याने स्पर्धेतील प्रत्येक सामन्याकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा विभागप्रमुख रमेश पटारे यांच्यासह राजेंद्र आढाव, इसाक सय्यद, महेश गोंडे, दानिश शेख, अविनाश कोळपे आदींनी परिश्रम घेतले. प्राचार्य नूर शेख यांनी आयोजनाची माहिती दिली. सूत्रसंचालन रेखा जाधव यांनी केले.

# दरोड्यातील फरार आरोपी दोन वर्षांनंतर एलसीबीच्या ताब्यात



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर येथील कोतवाली पोलीस ठाणे हद्दीत २०२४ मध्ये दरोडा टाकून एका कांदा व्यापाऱ्याला लुटण्यात आले होते. या गुन्ह्यात फरार असलेल्या आरोपीला गजाआड करण्यात दोन वर्षा नंतर एलसीबी पथकाला यश आले. जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार एलसीबी पथक फरार आरोपींचा शोध घेत असताना दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, कोतवाली पोलीस ठाण्यात दरोडा व आर्म क्टच्या दाखल असलेल्या गुन्ह्यात दोन वर्षापासून फरार असलेला आरोपी अंकुश उर्फ अर्जुन नामदेव पवार हा देवळाली प्रवरा ते बेलापूर जाणारे रोडवर उभा आहे. मिळालेल्या माहितीवरून पोलीस पथकाने सदर ठिकाणी शोध घेऊन आरोपी अंकुश उर्फ अर्जुन नामदेव पवार, वय २९ वर्षे, रा. प्रगती शाळेसमोर, राहुरी, याच्या मुसक्या आवळून ताब्यात घेतले. पुढिल तपास कामी आरोपीला कोतवाली पोलीस पथकाच्या ताब्यात देण्यात आले. सदरची कारवाई एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस अंमलदार अभिजीत अरकल, रमीजराजा आत्तार, आजिनाथ पाखरे, सागर ससाणे, रोहित येमुल, प्रशांत राठोड व जालींदर साखरे आदि पोलिस पथकाने केली.

# आदेश होऊनही कामे रखडली

## अधिकाऱ्यांचा गांधीगिरीने सत्कार करणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव** : छत्रपती शिवाजी महाराज चौकातील उघड्या गटारीचा धोकादायक खड्डा बुजविण्याचे आदेश होऊनही दीड महिन्यानंतरही काम न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. तसेच शहीद भगतसिंग जयंतीपूर्वी स्मारकाच्या चौथऱ्याची दुरुस्ती व रंगरंगोटी करण्याचे आदेश देऊनही काम पूर्ण झालेले नाही.

या प्रकाराचा निषेध म्हणून कामे प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित अधिकारी व तांत्रिक सल्लागारांचा गांधीगिरीच्या मार्गाने जाहीर सत्कार करून निषेध नोंदविण्यात येणार असल्याचे शिवाजी चौक मित्र मंडळाने म्हटले आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ. नीरज लांडे पाटील व शहीद भगतसिंग मित्रमंडळाचे अध्यक्ष नवनाथ कवडे यांनी दहीहंडी व गणेशोत्सवापूर्वी शिवाजी चौकातील गटारीचा खड्डा बुजवावा, तसेच खालच्या वेशीतील भगतसिंग स्मारकाची रंगरंगोटी व चौथऱ्याची दुरुस्ती जयंतीपूर्वी करावी, अशी मागणी नगरपरिषदेकडे केली होती. त्यानंतर मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी संबंधित विभागाला तातडीने काम करण्याचे आदेश दिले होते. मात्र, गणेशोत्सव संपूनही खड्डा तसाच आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तहसीलदार आकाश दहाडदे तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या बैठकीतही या धोकादायक खड्ड्याचा मुद्दा उपस्थित झाला होता. पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांनीही नगरपरिषदेला दुरुस्तीबाबत सूचना केली होती. ज्येष्ठ कार्यकर्ते सुनील रासने, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्ता फुंदे, वंचितचे शहराध्यक्ष प्रितम गर्जे यांच्यासह कार्यकर्त्यांनीही सातत्याने पाठपुरावा केला. गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान स्वयंसेवकांनी खड्ड्याभोवती कडे करून नागरिकांना सावध केल्याने संभाव्य दुर्घटना टळली. दरम्यान, खालच्या वेशीतील भगतसिंग स्मारकाचीही दुरवस्था झाली आहे. चौथऱ्याचा लोखंडी कठडा निखळला असून छताचा स्लॅब मोडकळीस आला आहे. रंगाचे पोपडे निघाले आहेत. मुख्याधिकारी घाडगे यांनी पंधरवड्यापूर्वी दुरुस्तीचे आदेश दिले होते. मात्र, भगतसिंग जयंती होऊनही काम सुरू न झाल्याने कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# उपनगराध्यक्ष राजीनामा नाट्यातून श्रीरामपूर नगरपालिकेत दुभंग

इच्छुक हिरमुसले...... नगरसेवकांची उत्कंठा शिगेला




**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : उपनगराध्यक्ष कांचन सानप यांनी ठरल्याप्रमाणे अद्यापही उपनगराध्यक्ष पदाचा राजीनामा न दिल्यामुळे यावरून श्रीरामपूर नगरपालिकेत नगरसेवकांमध्ये दुभंग निर्माण झाला आहे. नगराध्यक्ष पद करण ससाणे यांच्याकडेच असल्यामुळे यापुढे उपनगराध्यक्ष पदावर महिलांचीच निवड करण्यात येणार असल्याची पालिकेत चर्चा आहे. मात्र ऐनवेळी राजकीय घडामोडीत पुरुष नगरसेवकाची देखील या पदावर वर्णी लागण्याची शक्यता आहे. श्रीरामपूर पालिकेत कांचन सानप यांना उपनगराध्यक्ष पद देताना पुढील सहा सहा महिन्याच्या अटीवर उपनगराध्यक्ष बदलू असे पार्टी मीटिंगमध्ये तोंडी बोलीवर ठरले होते.

सानप यांना जानेवारी मध्ये उपनगराध्यक्ष पद देण्यात आले. त्यास आठ महिन्यांचा कालावधी झाला आहे. सानप यांना उपनगराध्यक्ष पद देताना ज्येष्ठ नगरसेवक दिलीप नागरे यांचे नाव त्यासाठी पुढे आले होते. मात्र ऐनवेळी सानप यांना हे पद सर्वानुमते देण्यात आले. सानप यांनी अद्यापही उपनगराध्यक्ष पदाचा राजीनामा न दिल्यामुळे इच्छुक नगरसेवक हिरमुसले आहेत. आपली संधी हुकते किंवा काय या समस्येने त्यांना ग्रासले आहे.

सानप यांनी राजीनामा दिल्यास कोणाची वर्णी लागणार हे जरी गुलदस्त्यात असले तरी मात्र सर्वजण सानप यांच्या राजीनाम्याची मोठ्या आतुरतेने वाट पाहत आहेत. उपनगराध्यक्ष पदा संदर्भात नगरपालिकेत अनेक जण रेस मध्ये आहेत. नगराध्यक्ष करण ससाणे तसेच आमदार हेमंत ओगले या संदर्भात कोणाची वर्णी लावतात याकडे अनेक नगरसेवकांचे लक्ष लागले आहे. उपनगराध्यक्षपद कोणाला बनविले जाते याबाबत अनेक नगरसेवकांची ही उत्कंठा शिगेला पोहोचली आहे.

सहा सहा महिन्याच्या अटीवर उपनगराध्यक्ष पद दिले गेल्यास सर्वच नगरसेवकांची नाराजी दूर होईल आणि सर्वांना संधी मिळेल अशी ही चर्चा नगरपालिकेत आहे.

# श्रीगोंद्यात दरोड्याचा डाव उधळला !

## एलसीबीच्या सापळ्यात दोघे जेरबंद ; तिघे पसार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : शहरात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या टोळीचा डाव स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने उधळून लावला. कणशेवाडी शिवारात रात्री सापळा रचून पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले, तर त्यांचे तीन साथीदार अंधाराचा फायदा घेत पसार झाले. या कारवाईत दोन दुचाकी, कोयता, कटावणी आणि मिरचीपूड असा तब्बल १ लाख ९० हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक श्रीगोंदा परिसरात दरोडा प्रतिबंधक पेट्रोलिंग करीत होते. कणशेवाडी ते श्रीगोंदा रस्त्यावरील शिवारात काही जण दुचाकींवरून दरोड्याच्या उद्देशाने जात असल्याची गोपनीय माहिती मिळताच पथकाने पंचांसमक्ष सापळा लावला.

दोन दुचाकींवरून आलेल्या संशयितांना पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला; मात्र त्यांनी दुचाकी वेगाने पळविल्या. पोलिसांनी पाठलाग करून राहुल उर्फ ठोल्या जसका उर्फ लंगड्या काळे (२३, रा. रांजणगाव मशीद,




ता. पारनेर) आणि प्रविण महेंद्र चव्हाण (१८, रा. पेडगाव, ता. श्रीगोंदा) यांना ताब्यात घेतले. तिघे फरार; पोलिसांकडून शोध सुरू चौकशीत टोळीतील जसका उर्फ लंगड्या अंकुश काळे, सागर अंकुश काळे आणि ज्योल्या उर्फ करण जसका उर्फ लंगड्या काळे हे तिघे अंधाराचा फायदा घेत पसार झाल्याचे समोर आले. राहुल काळे याने श्रीगोंदा येथे दरोडा टाकण्याच्या उद्देशाने जात असल्याचे सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८७३/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३१०(४), ३१०(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.